सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण

# महा आवास

## त्रैमासिक




@MAHAAWAAS www.mahaawaas.com

**जानेवारी ते मार्च २०२२**

# क्षणचित्रे



मा. मंत्री, ग्रामविकास, श्री.हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली महा आवास अभियान २.० दूरदृष्य प्रणालीव्दारे आढावा बैठकी प्रसंगी

महा आवास अभियान २.० जिल्हास्तरीय कार्यशाळे प्रसंगी सांगली येथे मा. मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. जयंत पाटील






महा आवास अभियान २.० विभागस्तरीय कार्यशाळे प्रसंगी औरंगाबाद येथे मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल श्री.अब्दुल सत्तार

मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली महा आवास अभियान २.० दूरदृष्य प्रणालीव्दारे आढावा बैठकी प्रसंगी



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | राजेश कुमार, भा.प्र.से.<br>अतिरिक्त मुख्य सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे,<br>संचालक,<br>राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण |
| प्रबंध संपादक | मंजिरी टकले, उपसंचालक<br>नीलेश काळे, उपसंचालक<br>संजय घोगळे, प्र. सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे, प्रशिक्षण समन्वयक |
| सहाय्यक संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे<br>प्रशिक्षण समन्वयक<br>(माहिती, शिक्षण व संवाद) |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.com |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |

वर्ष २ रे । अंक ७ वा । जानेवारी ते मार्च २०२२

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | विशेष - महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ उद्दिष्टपूर्ती | ३ |
| ३ | महा आवास अभियान-ग्रामीण मध्ये सक्रीय सहभाग घेणेबाबत मान्यवरांचे पत्र | ८ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | १० |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १२ |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १७ |
| | समन्वय उपक्रम | १९ |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | २२ |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २३ |
| | रमाई आवास योजना | २४ |
| | शबरी आवास योजना | २५ |
| | पारधी आवास योजना | २६ |
| | आदिम आवास योजना | २७ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २७ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/ यशोगाथा | २८ |
| ७ | फोटो गॅलरी | ३४ |
| ८ | मिडिया कवरेज | ३५ |


महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९



**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

महा आवास त्रैमासिकाच्या माहे जानेवारी ते मार्च २०२२ या अंकाच्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधतांना मला आनंद होत आहे. २० नोव्हेंबर, २०२१ पासून आपण राज्यात महा आवास अभियान टप्पा-२ ची सुरुवात मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांच्या शुभहस्ते व मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत केली आहे. महा आवास अभियान टप्पा -१ मध्ये ज्या प्रमाणे आपल्या सर्वांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला त्याचप्रमाणे टप्पा -२ मध्येही प्रतिसाद मिळत आहे, याचा आनंद आहे.

महा आवास अभियानाचा टप्पा-२ सुरु होऊन आज ४ महिने पेक्षा अधिकचा कालावधी झाला असून या कालावधीत आपण केलेल्या उद्दिष्ट पूर्तीची चर्चा सदर अंकाच्या पहिल्या भागामध्ये करण्यात आली आहे. महाआवास अभियानातील टप्पा -२ मध्येही १ ते १० उपक्रम राबविण्यात येत आहेत. टप्पा-२ ची आज अखेर उपक्रमनिहाय प्रगती पाहिली असता अद्यापही बरीच कामे अपुर्ण असल्याचे दिसून येते. उपक्रम १ मध्ये ५,४०६ भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात यश मिळाले असून अद्याप ५६,१७८ लाभार्थी अजूनही लाभापासून वंचित आहेत, याकडे आपण गांर्भीयाने लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच जागेची समस्या सोडविण्यासाठी बहुमजली इमारती, गृहसंकुले उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा. टप्पा २ च्या प्राप्त माहितीनुसार आज अखेर १७७ बहुमजली इमारती तर ७२ गृहसंकुले उभारण्यात आली आहेत.

अभियानातील दुसरा महत्वाचा उपक्रम लाभार्थ्यांच्या मंजूरीची प्रक्रिया १०० टक्के पुर्ण करणे यासाठी प्रधानमंत्री आवास योजना व राज्यपुरस्कृत योजनांतर्गत एकुण ६,३०,८७७ उद्दिष्टापैकी १,०५,५०९ इतक्या लाभार्थ्यांच्या मंजूरीची प्रक्रिया पुर्ण केली. परंतु अद्याप ५,२५,३६८ लाभार्थ्यांना मंजूरी देणे बाकी आहे. मंजूरीची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी व घरकुलाचे काम लवकरात लवकर सुरु करण्यासाठी लाभार्थी मेळावे, लाभार्थ्यांना मंजूरी पत्र वितरण, भूमिपूजन कार्यक्रम करण्यात यावेत. त्यातूनच घरकुलांचे काम प्रत्यक्ष सुरु होणार आहे. मंजूरीनंतर पहिल्या हप्त्याचे वितरण ७ दिवसाच्या आत करणे बाबत सुचना दिलेल्या आहेत. असे असले तरी मंजूर १,०५,५०९ घरकुलांपैकी केवळ ४७,१२७ लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात आले असून अद्याप ५८,३८२ बाकी आहेत. याला गती देण्यासाठी स्थानिक स्तरावर पहिला हप्ता वितरण कार्यक्रमांचे आयोजन करून तात्काळ मनरेगा मस्टर जनरेट करण्याची कार्यवाही पुर्ण होणे गरजेचे आहे. प्रधानमंत्री आवास योजना व राज्य योजनेतील ७०,७५४ घरकुले पूर्ण झाली असून अद्याप मंजूर केलेली ४,०९,११२ घरकुले पूर्ण करणे बाकी आहे.

घरकुले वेळेत पुर्ण होण्यासाठी त्यांना लागणारे साहित्य अल्पदरात व नजीकच्या ठिकाणी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने घरकुल मार्ट ही संकल्पना सुरू करण्यात आली. यास टप्पा १ प्रमाणेच टप्पा २ मध्येही प्रतीसाद मिळताना दिसून येत असला तरी २,००० उद्दिष्टापैकी आज अखेर आपण २३२ घरकुल मार्ट सुरू करू शकलो आहे. घरकुलांच्या भौतिक पुर्णत्वा सोबतच आर्थिकदृष्टयानेही घरकुले पुर्ण करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने आज अखेर आपण ६५१५९ घरकुले पुर्ण करू शकलो असून अद्याप ८९,२१९ घरकुले आर्थिकदृष्टया पुर्ण करणे बाकी आहे. त्याचप्रमाणे प्रलंबीत घरकुलांची (Delayed Houses) समस्याही आपणास भेडसावत आहे. यामध्ये कमी होण्यापेक्षा वाढ होताना दिसून येत आहे. त्यामुळे याबाबत घरकुलनिहाय नियोजन करून अभियान समाप्तीपर्यंत प्रलंबीत घरकुले शुन्यावर आणणे हे आपले उद्दिष्ट आहे. लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासंबंधी सविस्तर माहिती प्राप्त करून देण्यासाठी डेमो हाऊस संकल्पना टप्पा १ मध्ये मांडण्यात आली त्यानुसार आज अखेर २९१ तालुकास्तरीय डेमो हाऊस पूर्ण करण्यात आलेली असली तरी अद्याप ६० तालुक्यांमध्ये डेमो हाऊसचे काम अपुर्ण आहे. याकडे आपण लक्ष देऊन ही पुर्ण करून घ्यावी. महा आवास अभियान टप्पा २ मध्ये जिल्हा डेमो हाऊसची संकल्पना मांडण्यात आली असून आज अखेर ३० जिल्हयांमध्ये जिल्हास्तरीय डेमो हाऊससाठी जागा उपलब्ध झाली असल्याचे दिसून येते. पुर्ण झालेल्या तालुकास्तरीय डेमो हाऊसमध्ये बचत गट स्वयंसहायता गट, सहकारी संस्था यांचेमार्फत कॉप-शॉप सुरू करण्याच्या सुचना दिलेल्या असून आज अखेर तालुकास्तरीय डेमो हाऊसेस मध्ये ४७ तालुक्यात कॉप-शॉप सुरु करण्यात आल्याचे प्राप्त माहितीवरून दिसून येते.

आज अखेर आवासप्लसमधील ९४ टक्के लाभार्थ्यांचे आधार सिडींग पूर्ण झाले असुन उर्वरीत आधार सिडींग तात्काळ पुर्ण करणे गरोचे आहे. तसेच लाभार्थ्यांचे जॉबकार्ड मॅपिंगचे काम ९९.६ टक्के झाले असून त्याचा आनंद आहे, उर्वरीतही तात्काळ पुर्ण करून घ्यावे. राज्य योजनेतील लाभार्थ्यांचे आधार सिडींग पूर्ण करावयाचे असून आज अखेर केवळ ७ टक्केच लाभार्थ्यांचे आधार सिडींग पूर्ण झाले आहे. याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे जेणेकरून दुबार लाभ टाळता येऊ शकेल. शासकीय योजनांचा कृतीसंगम बाबत आपणास आवाससॉफ्टवर लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली असून त्यामध्ये स्वच्छ भारत मिशन मधून शौचालय, जल जीवन मिशन मधून नळाने पाणी, उज्वला योजनेतून गॅस जोडणी, सौभाग्य योजनेतून वीज, ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत बचत गटात लाभार्थ्यांचा सहभाग याबातची

माहिती तात्काळ पुर्ण करून घ्यावी. या शिवाय टप्पा -२ मध्ये लाभार्थ्यांना मुलभूत नागरी सुविधा देण्यासाठी विविध शासकीय योजनांशी कृती संगम करण्यात आला आहे. यामधील प्रगती पाहता पुर्ण झालेल्या घरकुलांच्या प्रमाणात अत्यल्प लाभार्थ्यांनाच याच लाभ मिळाल्याचे दिसून येते. जसे की, महा ऊर्जा मार्फत सौर ऊर्जेचा लाभ १६,३६४, दलित वस्ती सुधार योजनेतून २४,७१५, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना १५,३९५, जिल्हा परिषद सेस अंतर्गत ८,८१२, पंचायत समिती सेस ७,५११, ग्रामपंचायत सेस १५,८८० व सीएसआर च्या माध्यमातून ३,९२२ लाभार्थ्यांना मुलभूत नागरी सुविधा देण्यात आलेल्या आहेत.

टप्पा २ मध्ये राबविण्यात येत असलेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमांना अल्प गती दिसून येत आहे. प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये १ बहुमजली गृहसंकुल (अपार्टमेंट) उभारण्याचे उद्दिष्ट असून यापैकी प्राप्त माहितीनुसार १५८ बहुमजली गृहसंकुले (अपार्टमेंट) उभारल्याचे दिसून येते. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये लॅण्ड बँक सुरू करण्याचे उद्दिष्ट असून १,०२० लॅण्ड बँक तसेच प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये १ सॅण्ड बँक उद्दिष्ट असून १,१३३ सॅण्ड बँक ची उभारणी करण्यात आली आहे. एकूण घरकुलांच्या १० टक्के घरकुले किफायतशीर व १० टक्के आदर्श घरकुले तयार करावयाची असून पैकी केवळ १२,४३१ किफायतशीर व १८,३२४ आदर्श घरकुलांची निर्मिती करण्यात आली. अभियानाला दृश्य रुप प्राप्त करुन देण्यासाठी विविध माहिती शिक्षण, संवाद उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यामध्ये सर्व ३४ जिल्हयात जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न झालेल्या आहेत तर तालुकास्तरीय कार्यशाळा २५७ ठिकाणी पार पाडल्या असून अद्याप ९४ तालुक्यातील कार्यशाळा घेणे बाकी आहे. ग्रामपंचायत स्तरावर १५,५१९ कार्यशाळा, ग्रामकृती गटाचे गठण १४,३०१, १३,९८३ ग्रामपंचायतीमध्ये लाभार्थी मेळावे, ८,७५४ ग्रामपंचायतीमध्ये बँक मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. असे असले तरी ग्रामस्तरीय कार्यशाळा १३,११२, ग्रामकृती गटाचे गठन १४,३३०, लाभार्थी मेळावे १४,६२८, बँक मेळावे १९,८७७ बाकी आहेत. याचे नियोजन पुढील काळामध्ये करणे गरजेचे आहे. याशिवाय सर्व जिल्हा व तालुका स्तरावर होर्डिंग / पोस्टर, ग्रामपंचायत स्तरावर बॅनर व पोस्टर लावणे गरजेचे आहे.

या अंकामध्ये केंद्र, राज्य व जिल्हा स्तरावरील विविध बैठका, कार्यक्रम, उद्‌घाटन, कार्यशाळा, क्षेत्रीय भेटी, नाविन्यपुर्ण उपक्रम व यशोगाथा याचाही अंर्तभाव करण्यात आला असून या घटनांची थोडक्यात नोंद येथे घेणे गरजेचे वाटते. ग्रामविकास विभाग भारत सरकार यांच्या मार्फत आवास सॉफ्टच्या डॅश बोर्डचे मा. प्रधानमंत्री यांच्या शुभहस्ते उद्‌घाटन कार्यक्रमाचे वृत्तांकन, नांदेड येथील मा. पालकमंत्री श्री. अशोक चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हास्तरीय कार्यशाळेचे वृत्तांकन, अभियानामध्ये तालुकास्तरावर उभारण्यात आलेल्या तालुकास्तरीय डेमो हाऊस यांच्या लोकार्पणाचे वृत्तांकन, लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठीच्या अडचणी बाबत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ठाणे सोबत राज्य व्यवस्थापन कक्षाच्या अधिकाऱ्यांची क्षेत्रीय भेटीचे वृत्तांकन, अभियानाला गती देण्यासाठी मा. मंत्री, ग्रामविकास व मा. राज्यमंत्री ग्रामविकास व महसूल, मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकांचे सविस्तरवृत्त सदर अंकामध्ये देण्यात आले आहे. याबरोबरच भारत सरकारच्या ग्रामीण विकास विभागाचे संचालक श्री. चंदेर शेखर (ग्रामीण गृहनिर्माण) यांनी राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण च्या आढावा बैठकीबाबतचे वृत्त, योजनांच्या संनियंत्रणासाठी राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकाऱ्यांच्या क्षेत्रीय भेटीचे वृत्तांकन, राज्य व्यवस्थापन कक्षा मार्फत घेण्यात आलेल्या बैठका, नंदूरबार जिल्हयाची आढावा बैठक, अकोला जिल्हा आढावा बैठक याचे सविस्तर वृत्तांकन केले आहे. तसेच राज्यातील विविध जिल्हयातील IEC उपक्रमांची नोंद घेण्यात आली आहे,

मा. केंद्रीय मंत्री, ग्रामीण विकास, भारत सरकार, श्री. गिरीराज सिंग यांनी प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावा घेतला, यावेळी आपल्या राज्याचे ग्राविकास विभागाचे मा. मंत्री व मा. अतिरिक्त मुख्य सचिव उपस्थित होते. या बैठकीत केंद्रीय मंत्र्यांनी दिलेल्या सुचना व त्या अनुषंगाने राज्याचे मा. मंत्री यांच्याशी झालेली चर्चा याची सविस्तर माहिती सदर अंकात देण्यात आली आहे.

घरकुल लाभार्थ्यांना सीएसआर माध्यमातून मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी उद्योजकांशी संवाद साधण्यात आल्याचे वृत्त, घरकुल लाभार्थ्यांना शौचालयाचा लाभ मिळवून देण्यासाठी संचालक, स्वच्छ भारत मिशन यांच्या सोबतची बैठकीचे वृत्तांकन या माध्यमातून पुढील कामाची दिशा याचे वृत्त, मानवत परभणी येथील पहिल्या हप्त्याचे वितरण व भूमिपूजन कार्यक्रम याची माहिती देण्यात आली आहे. राज्य शासनाने घेतलेला महत्वपूर्ण निर्णय जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यापुढे १००% राज्य योजना म्हणून राबविण्यास दिलेली मान्यता याचे वृत्तांकन करण्यात आले आहे. तसेच योजनानिहाय संचित प्रगती अहवालामध्ये जिल्ह्यांच्या राज्य व राष्ट्रीय रँक देण्यात आली आहे.

नाविण्यपूर्ण उपक्रम अथवा यशोगाथा मध्ये मुंडीपार, पवनी, भंडारा येथील पुष्पा शेलमारे, मंगळसा, मंगरूळपीर, वाशिम येथील श्रीम. उषा दिलीप भडांगे, मुगर, मुदखेड, नांदेड येथील उत्तम पुरभाजी हटकर, साळवे, शिंदखेडा, धुळे येथील अंजना गोपाळ भारती, केसरवाडी, जावळी, सातारा येथील ४ कातकरी समाजाचे लाभार्थी व हरकुल, कणकवली, सिंधुदुर्ग येथील श्रीम. शुभांगी घाडीगांवकर यांची यशोगाथा प्रेरणादायी आहे. यासर्व बाबींचा समावेश छायाचित्रांसह सदर अंकामध्ये करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने आपण अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा ही अपेक्षा व्यक्त करतो.

हा अंक आपणास निश्चितच आवडेल याची खात्री आहे. आपणा सर्वांना शुभेच्छा ! धन्यवाद.

**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक**
**राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण**

विशेष

# महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ उद्दिष्टपूर्ती

राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणी मध्ये गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ३१ मार्च, २०२२ या कालावधीत राज्यात **'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२'** राबविण्यात आले. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ राज्याचे मा. मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ यांच्या शुभहस्ते व मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

महा आवास अभियान-ग्रामीण २.० अंतर्गत दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ ते ३१ मार्च, २०२२ या अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांची उद्दिष्टपूर्ती पुढील प्रमाणे आहे.




## भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता

ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजने मधून २३८, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याच्या योजने मधून ११०७, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या योजने मधून १३३० व इतर मार्ग उदा. बक्षीसपत्र, भाडेपट्टा, इ. उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून २७३१ अशा एकुण **५,४०६** भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागेची उपलब्धता केली.

त्याचप्रमाणे जागेची अडचण लक्षात घेता कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी अभियान कालावधीत **१७७ बहुमजली इमारती व ७२ गृह संकुलांची** उभारणी करण्यात आली आहे.



## घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे मंजूरी देणे

केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत सन २०१६-१७ ते २०२१-२२ पर्यंत जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेल्या घरकुलांच्या उद्दिष्टांप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ५,७६१ व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण आवास योजना अंतर्गत १८,४०० अशा एकुण २४,१६१ घरकुलांना मंजूरी देण्यात आली आहे. याकरीता १७,७६० लाभार्थी मेळाव्यांचे आयोजन करून घरकुल लाभार्थ्यांची नोंदणी (Registration), Geo tagging, Account Verification, इ. प्रक्रिया किमान कालावधीत पूर्ण करुन घरकुलांना मंजूरी देण्यात आली. तसेच ३५,०५४ लाभार्थ्यांना घरकुल मंजूरीचे पत्र त्वरीत वितरीत करून घरकुलाचे काम तात्काळ सुरु करणेबाबत सूचना देण्यात आल्यात. त्यासोबतच लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाबाबत तांत्रिक मार्गदर्शन वेळोवेळी करण्यात आले. २१,६४७ घरकुलांचे भूमिपूजन कार्यक्रम करुन ५५,९१७ घरकुलाचे बांधकाम प्रत्यक्ष सुरु करण्यात आले आहे.

## मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण

केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत सन २०१६-१७ ते २०२१-२२ मधील मंजूर घरकुलांना



पहिल्या हप्त्याचे वितरण विनाविलंब करण्याकरीता घरकुलास मंजूरी दिलेल्या २१,९५६ लाभार्थ्यांना **७ दिवसाच्या आत पहिल्या हप्त्याचे वितरण** व स्थानिक स्तरावर ८,१२१ पहिला हप्ता वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ३५,७६३ व राज्य पुरस्कृत योजना अंतर्गत ११,३६४ अशा एकुण **४७,१२७** मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. त्यासोबतच पहिला हप्ता वितरण झाल्याबरोबर तात्काळ ७,९०८ मनरेगा मस्टर जनरेट करणेबाबतची कार्यवाही करण्यात आली.

## सर्व मंजूर घरकुले भौतिक व आर्थिक दृष्ट्या पूर्ण

केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत सन २०१६-१७ ते २०२१-२२ मधील सर्व मंजूर घरकुलांचे काम भौतिक व आर्थिक दृष्ट्या पूर्ण करण्यासाठी राज्यात महिला स्वयंसहायता गट/ग्राम संघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थाद्वारे **२३२ घरकुल मार्ट सुरु करुन** त्याद्वारे घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे - दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ.ची उपलब्धता करण्यात आली. किमान कालावधीमध्ये घरकुले भौतिकदृष्टया पूर्ण करण्यासाठी सरपंच, ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी घरकुलांना वेळोवळी भेटी, आवास प्लस द्वारे घरकुल बांधकामाचे टप्पानिहाय फोटो अपलोड करणे, मनरेगा मस्टर जनरेट करणे व **मंजूर केलेली सर्व घरकुले १०० ते १२० दिवसात पूर्ण करणे** या सारख्या उपाययोजना राबविण्यात आल्या. तसेच सर्व घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण करण्यासाठी ६५,१५९ लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाच्या भौतिक प्रगतीनुसार टप्पानिहाय **सर्व हप्ते किमान कालावधीत वितरीत करण्यात आले.** तसेच इच्छूक लाभार्थ्यांना वित्तीय संस्थांकडून गृहकर्ज मिळवूण देण्यात आले.

या उपक्रमांतर्गत अभियान कालावधीत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ४७,७९९ व राज्य पुरस्कृत विविध योजना अंतर्गत २२,९५५ असे एकुण ७०,७५४ मंजूर घरकुलांचे काम भौतिक व आर्थिक दृष्ट्या पूर्ण केले आहे.






## प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेली, मात्र अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी प्रलंबित घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून त्या **कारणांचे विश्लेषण करुन त्यावर उपाययोजना करून प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यात येत आहे.** याकामी गरजेप्रमाणे तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने **लोक अदालत** द्वारे लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करण्यात आले. पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार Refund करुन Remand करणे, तसेच यापुढे प्रलंबित घरकुलांच्या यादीमध्ये नविन घरकुलांचा समावेश होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना राज्यस्तरावरून देण्यात आल्या आहे.



## ग्रामीण गवंडी प्रशिक्षण

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत **६,०२० ग्रामीण गवंडी प्रशिक्षण** कार्यक्रमाचे उद्दिष्ट प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून पूर्ण

करुन कुशल गवंडी तयार करण्यात आले आहे. गवंडी प्रशिक्षण पूर्ण करुन **३,७२७ गवंड्यांचे मुल्यांकन (Assessment) पूर्ण** करुन सदर माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत करण्यात आली. तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध १०,२५८ प्रशिक्षित गवंड्यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे १०,०२५ पॅनेल तयार करून या पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेण्यात येत आहे.



## डेमो हाऊस (Demo House) निर्मिती व उपयोग

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत **२९१ तालुकास्तरीय डेमो हाऊसेसची** निर्मिती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्याच्या Geo-Climatic, Socio- Cultural Conditions व Locally Available Construction Materials इ. चा विचार करुन **जिल्हास्तरीय डेमो हाऊसेसच्या** निर्मितीचे काम प्रगती पथावर आहे.

तालुकास्तरीय डेमो हाऊसला **१,५०,२७५ घरकुल लाभार्थ्यांनी** प्रत्यक्ष भेटी दिलेल्या आहे. तसेच डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महिला स्वयंसहायता गट/ग्रामसंघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थांच्या सहकार्यातून ४७ **कॉप-शॉप** (Co-op Shop) सुरु करण्यात आले आहे.



## ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे आधार सिडींग व जॉब कार्ड मॅपिंग पूर्ण करणे

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजना मधील सर्व लाभार्थ्यांचे आधार सिडींग व जॉब कार्ड मॅपिंग पूर्ण करणे या उपक्रमांतर्गत **प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण** मधील **४२,५४,०५८** लाभार्थ्यांचे आधार सिडींग पूर्ण करण्यात आले असून **४४,२४,४१८ लाभार्थ्यांचे जॉब कार्ड मॅपिंग करण्यात आले आहे.** तसेच **राज्य पुरस्कृत** रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, इ. विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनेतील **३२,९९८ लाभार्थ्यांचे आधार सिडींग** पूर्ण करण्यात आले असून येत्या कालावधीत उर्वरित कामे पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

## शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence)

शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगमातून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून ९९,९४,७२८ लाभार्थ्यांना** रोजगार, **स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून १,८०,५७५ लाभार्थ्यांना शौचालय,** जल **जीवन मिशन मधून १,९५,७७६ घरकुलांना** नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, **प्रधानमंत्री उज्वला योजने मधून १,४०,८९८**






**लाभार्थ्यांना** गॅस जोडणी, **सौभाग्य योजने मधून १,१२,६४९ घरकुलांना** विद्युत जोडणी, **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन मधून ९१,०२३ लाभार्थ्यांना** उपजिविकेचे साधन उपलब्धता, **महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा) मधून १६,३६४ लाभार्थ्यांना लाभ,** इ. शासकीय योजनांशी कृतीसंगम करून घरकुल लाभार्थ्यांना लाभ देवून त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे.

तसेच २४,७१५ दलित वस्ती सुधार योजना, १५,३९५ ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, ८,८१२ जिल्हा परिषद सेस, ७,५११ पंचायत समिती सेस, १५,८८० ग्राम पंचायत सेस, ३,९२२ सीएसआर निधी इ. च्या माध्यमातून **लाभार्थ्यांना एकुण ७६,२३५ मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे, इ. दिल्या आहे.**



**नावीन्यपूर्ण उपक्रम (Innovations / Best Practices)**

राज्य व केंद्र पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता येण्यासाठी **१४८ बहुमजली गृह संकुले (हाऊसिंग अपार्टमेंट)** उभारण्यात आली असून त्यांच्या सहकारी संस्था स्थापन करणे बाबतची कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर **विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची १,०२० लॅण्ड बँक** व सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी **१,१३३ सॅण्ड बँक ची निर्मिती** करण्यात आली आहे. **वाळूला पर्याय** म्हणून क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इत्यादींचा वापर करण्यात आला आहे.

राज्यात **१२,४३१** घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान, इ. चा वापर करण्यात आला असून **१८,३२४** घरकुल बांधकामामध्ये फरशी/लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ.चा वापर करण्यात आला आहे.

**जागतिक महिला दिनी विशेष कार्यक्रमांचे आयोजन**

राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण २.० या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व महिलांना सक्रीय सहभागी करण्यासाठी दिनांक ०८ मार्च, २०२२ रोजीच्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला सक्षमीकरणाच्या हेतूने राज्यात विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये ग्रामीण आवास योजनांतर्गत घरकुले पूर्ण झालेल्या महिला लाभार्थ्यांचे एकत्रित गृहप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. बचत गटात समाविष्ट नसलेल्या महिला घरकुल लाभार्थ्यांचा स्वंयसहायत्ता बचत गटात समावेश करण्यात आला. ग्रामीण आवास योजने अंतर्गत ज्या महिला लाभार्थ्यांनी अद्यापपर्यंत घरकुल बांधकाम सुरू केले नाही, अशा महिला लाभार्थ्यांचा एकत्रित भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण गवंडी प्रशिक्षणांतर्गत इच्छुक महिलांचा समावेश करण्यात आला. तसेच गवंडी प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केलेल्या महिलांचा सत्कार करण्यात आला. महा आवास अभियान-ग्रामीण २.० च्या यशस्वीतेसाठी उत्सफूर्तपणे सहभाग घेतलेल्या महिला/लाभार्थी/कर्मचारी/अधिकारी/पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. महिला लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी गृहकर्ज मिळवून देण्यासाठी बँक








मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले. पंचायत समिती आवारामध्ये उभारण्यात आलेल्या डेमो हाऊसेस मध्ये कॉप-शॉप सुरू करण्यात आले. यासाठी स्वंयसहायत्ता महिला बचत गटांना प्राधान्यक्रम देण्यात आला. विविध शासकीय योजनांशी कृती संगम करून महिला घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात आला. सर्व महिला लाभार्थ्यांच्या नावांची नोंद ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घेण्यात आली. त्याचप्रमाणे गावोगावी महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत महिला मेळाव्यांचे आयोजन करून विविध आवास योजनांबाबत प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृती करण्यात आली. इ. उपक्रम जागतिक महिला दिनी महिलांच्या सक्षमिकरणासाठी राबविण्यात आले.



जागतिक महिला दिनी राबविण्यात आलेल्या उपक्रमांमध्ये महिला, महिला घरकुल लाभार्थी, विभाग, जिल्हा, तालुका, ग्रामस्तरावरील सर्व अधिकारी/कर्मचारी, पदाधिकारी, ग्रामस्थ व लोक इ. सक्रीय सहभागी झाले. या उपक्रमांमुळे ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामांना गतिमानता, प्रचार, प्रसिध्दी व जन-




जागृती मिळण्यासाठी मोलाची मदत झाली आहे. हे उपक्रम महिलांना सन्मानासाठी राबविण्यात आले असल्याने महिला व महिला घरकुल लाभार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.

जागतिक महिला दिन ०८ मार्च, २०२२ रोजी उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत महाजीविका अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामीण महिलांचा गौरव सोहळा मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांच्या शुभहस्ते व मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी, उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, डॉ. हेमंत वसेकर व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.




## महा आवास अभियान २.० ला मुदतवाढ

राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण २.० या अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू आहे. अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमानता व गुणवत्ता आली आहे. अभियान कालावधीत गृहनिर्माण क्षेत्रातील उद्दिष्टपूर्तीचा आलेख पाहता व सर्व स्तरावरून लोक प्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांची अभियानाला मुदतवाढीची मागणी लक्षात घेता, या अभियानाला ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.प्रआय२०२१/प्र.क्र.९७/योजना-१०, दिनांक ३१ मार्च, २०२२ अन्वये दिनांक ०१ मे २०२२ पर्यंत शासनाने मुदतवाढ दिली आहे.

# मा. मुख्यमंत्री यांचे पालक मंत्री यांना अभियानात सक्रीय सहभाग घेण्याबाबत पत्र

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्य मंत्री
महाराष्ट्र



मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

**विषय :- महा आवास अभियान - ग्रामीण २०२१-२२ मध्ये सक्रिय सहभाग घेण्याबाबत...**

"सर्वांसाठी घरे - २०२२" हे केंद्र शासनाचे धोरण असून राज्य शासनानेदेखील या धोरणाचा स्वीकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व अटल बांधकाम कामगार आवास योजना इत्यादी योजना राबविण्यात येत आहेत. या धोरणाच्या अनुषंगाने पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमणे नियमानुकूल करणे व लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करुन देणे अशा प्रकारचे पूरक कार्यक्रमसुध्दा राज्यात राबविण्यात येत आहेत. ग्रामीण गृहनिर्माण योजना गतिमान करणे व घरकुलांची गुणवत्ता वाढविणे या हेतूने दि. २० नोव्हेंबर २०२० ते ५ जून २०२१ या कालावधीत राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात आले. सदर अभियानात सक्रिय सहभागी होऊन केलेल्या कामाबद्दल प्रथमत: आपले मन:पूर्वक अभिनंदन! अभियान न थांबता पुढे चालावे या हेतूने यावर्षी देखील राज्यात दि. २० नोव्हेंबर २०२१ ते दि. ३१ मार्च २०२२ या कालावधीत "महा आवास अभियान-ग्रामीण २.०" राबविण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाने घेतला आहे. या अभियानास देखील भरघोस प्रतिसाद आपणाकडून मिळेल ही अपेक्षा आहे.

ग्रामीण गृहनिर्माण योजनांना गतिमान करणे व घरांची गुणवत्ता वाढविणे या उद्देशाबरोबरच, अभियानादरम्यान नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे, शासनाच्या विविध योजनांशी कृतिसंगम घडवून आणणे, स्वयंसेवी संस्था, खाजगी संस्था, बँका, लोकप्रतिनिधी, सहकारी संस्था इत्यादी भागधारकांचा सक्रिय सहभाग घेणे अशा प्रकारच्या उद्देशांचा देखील समावेश करण्यात आला आहे.

**महा आवास अभियान - ग्रामीण २.० अंतर्गत राज्यात खालील उपक्रम राबविण्यात येणार आहेत :-**

१. भुमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामसाठी विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून जागा उपलब्ध करुन देणे. तसेच कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी राज्यात बहुमजली इमारती, गृहसंकुले उभारणे.
२. घरकुलांच्या उद्दिष्टाप्रमाणे सर्व घरकुलांना विनाविलंब **१००** टक्के मंजूरी देणे.
३. मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे **१००** टक्के वितरण करणे. त्याकरिता घरकुलास मंजूरी दिलेल्या लाभार्थ्यांना **७** दिवसाच्या आत पहिल्या हप्त्याते वितरण करुन मनरेगा मस्टर जनरेट करणेबाबतची कार्यवाही करणे.
४. सर्व मंजूर घरकुले भौतिक व आर्थिकदृष्ट्या पूर्ण करणे. तसेच मंजूर केलेली सर्व घरकुले **१००** ते **१२०** दिवसात पूर्ण करुन घरकुल बांधकामाच्या भौतिक प्रगतीनुसार टप्पानिहाय सर्व हप्ते किमान कालावधीत वितरीत करणे व गरजेप्रमाणे इच्छुक लाभार्थ्यांना वित्तीय संस्थांकडून गृहकर्ज मिळवून देणे.
५. प्रलंबित घरकुले पूर्ण करणे. सदर घरकुले पूर्ण करणेकामी लोक अदालतद्वारे लाभार्थ्यांना प्रवृत्त करणे व पूर्ण न होऊ शकणारी घरकुले रिफंड करुन रिमांड करणे.
६. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे. तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांचे ग्रामपंचायत निहाय पॅनल तयार करुन ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या घरकुल बांधकामात सहभाग घेणे.
७. तालुकास्तरीय अपूर्ण डेमो हाऊस पूर्ण करुन जिल्हास्तरीय डेमो हाऊसची निर्मिती करणे. तसेच तालुका व जिल्हास्तरीय डेमो हाऊसला घरकुल लाभार्थ्यांच्या प्रत्येक्ष भेटीचे आयोजन करणे, लाभार्थी, महिला स्वयं सहाय्यता गट/ ग्रामसंघ/ प्रभाग संघ/ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/ शेतकरी उत्पादक कंपनी इ. समुदाय आधारित संस्थाच्या सहकार्यातून कॉप-शॉप सुरु करणे.
८. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे आधार सिडींग व जॉब कार्ड मॅपिंग पूर्ण करणे.
९. शासनाच्या विविध योजनांशी कृतिसंगमातून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनातील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावणे. तसेच दलित वस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्रामपंचायत सेस, सीएसआर निधी इत्यादींच्या माध्यमातून लाभार्थ्यांना मूलभूत नागरी सुविधा जसे अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे इत्यादी उपलब्ध करुन देणे.
१०. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता येण्यासाठी राज्यात प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये किमान एक बहुमजली गृहसंकुल (हाऊसींग अपार्टमेंट) उभारणे आणि त्याची सहकारी संस्था स्थापन करणे. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत स्तरावर लॅण्ड बँक व सॅण्ड बँक ची निर्मिती करणे. तसेच घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनविन, किफायतशीर, नैसर्गिक आपत्ती रोधक बांधकाम तंत्रज्ञानासह घरकुल बांधकामामध्ये फरशी, लादी रंगरंगोटी, किचन गार्डन/ परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौर ऊर्जा साधणे व नेट बिलींग इ. चा वापर करणे.

**या अभियानाच्या अंमलबजावणीमध्ये आपणाकडून खालील बार्बीमध्ये सहकार्य अपेक्षित आहे.**

अ) या अभियानांतर्गत विविध प्रशासकीय विभागांच्या जिल्हास्तरीय यंत्रणा जसे-जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना अभियान यशस्वी होण्याकरिता जिल्ह्याचे पालक मंत्री म्हणून मार्गदर्शन करणे.
ब) या अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या अंमलबजावणीकरिता जिल्हा विकास नियोजन समितीचे अध्यक्ष म्हणून आवश्यक ते सक्रिय सहकार्य करणे.
क) या अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये विविध प्रकारच्या कार्यशाळा, लाभार्थी व बँक मेळावे इत्यादींच्या माध्यमातून संबंधितांना मार्गदर्शन करणे.
ड) या अभियानांतर्गत जिल्ह्यामधील शासकीय यंत्रणा, पंचायतराज संस्था, कॉर्पोरेट संस्था, स्वयंसेवी संस्था, लोकप्रतिनिधी व लाभार्थी इत्यादी सर्वांचा सक्रिय सहभाग अपेक्षित असल्याने या संदर्भात संबंधितांना मार्गदर्शन करणे.

या अभियानाची अंमलबजावणी करणाऱ्या विविध स्तरावरील उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना राज्य/ विभाग/ जिल्हा/ तालुका/ ग्राम स्तरावरुन पुरस्कार देण्यात येणार आहे. तरी आपल्या मार्गदर्शनाखाली आपल्या जिल्ह्यात महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत आपल्या जिल्ह्याचा या अभियानांतर्गत प्रथम क्रमांक येण्यासाठी व अभियान यशस्वी होण्यासाठी आपण पालकमंत्री या नात्याने व्यक्तिश: प्रयत्न कराल हीच अपेक्षा!!

आपला,

**(उध्दव बाळासाहेब ठाकरे)**

**प्रति,**
**पालकमंत्री, जिल्हा** -------------------,
मंत्रालय, मुंबई.

मुख्यमंत्री सचिवालय, ६ वा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
**दूरध्वनी** : २२०२ १८५० / २२०२ ०५०० फॅक्स : २२८२ १२३७

# मा. उपमुख्यमंत्री राज्य यांचे जिल्हा परिषद अध्यक्ष यांना अभियानात सक्रीय सहभाग घेणेबाबत पत्र

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य



**दिनांक ११ फेब्रुवारी २०२२**

**विषय :- महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ मध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत...**

ग्रामीण भागातील बेघर तथा कच्या घरात वास्तव्यास असणा-या कुटूंबाचे पक्या घरात वास्तव्याचे स्वप्न पूर्ण व्हावे व त्यांचे राहणीमान उंचवावे, या हेतूने केंद्र शासनाने "सर्वांसाठी घरे- **२०२२**" या धोरणाचा स्वीकार केला आहे. राज्य शासनाने देखील हे धोरण अंगीकृत केले असून राज्यांत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई, शबरी, आदिम व पारधी आवास योजना तसेच अटल बांधकाम कामगार आवास योजना - ग्रामीण व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना इ. ग्रामीण घरकुल योजना पूर्ण क्षमतेने राबविण्यात येत आहेत.

गतवर्षी राबविलेल्या "महा आवास अभियान-ग्रामीण" टप्पा-**१** मध्ये आपण दिलेल्या योगदानाबद्दल अभिनंदन. याला अनुसरुन यावर्षी ही सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी दिनांक "**२०** नोव्हेंबर, **२०२१** ते दिनांक **३१** मार्च, **२०२२**" या कालावधीमध्ये "महा आवास अभियान-ग्रामीण" टप्पा-**२** राबविण्यात येत आहे. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ, मा. मंत्री, ग्राम विकास, यांच्या शुभहस्ते मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल व मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

आपण आपल्या जिल्हयातील सर्व पात्र लाभार्थी यांना घरकुल योजनेचा लाभ मिळणेसाठी, हे अभियान जिल्ह्यांतील सर्व तालुके व ग्रामपंचायतीमध्ये लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या सहभागातुन लोक चळवळ म्हणून राबविले जाईल याचे नियोजन करावे. अभियानाच्या शासन निर्णयात दिल्याप्रमाणे प्रामुख्याने **१०** उपक्रमांवर विशेष लक्ष द्यावे. यासाठी पुढील बाबींवर प्राधान्याने लक्ष द्यावे.

१. घरकुलांच्या उद्दिष्टानुसार **१००** टक्के लाभार्थ्यांच्या घरकुलांना विनाविलंब मंजूरी दयावी व मंजूर केलेली सर्व घरकुले **१००** टक्के पूर्ण होतील याचे नियोजन करावे.
२. भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी गावोगावी लॅण्ड बँक उभारण्यासाठी चळवळ उभी करावी.
३. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित सर्व अधिकाऱ्यांच्या समन्वयाने लाभार्थ्यांना घरकुलासाठी वाळू उपलब्ध होण्यासाठी गावोगावी सॅण्ड बँक ची निर्मिती करावी.
४. बहुमजली गृहसंकुले (हाऊसिंग अपार्टमेंट) उभारुन त्यांच्या सहकारी संस्था उभाराव्यात.
५. घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान इ. चा वापर करणेसाठी लाभार्थीना प्रोत्साहीत करावे.
६. ग्रामीण भागात बांधकाम साहित्य गावोगावी सहज उपलब्ध होण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून घरकूल मार्ट सुरु करावेत.
७. घरकुल बांधकामा बरोबर किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग इ. चा वापर करावा.
८. घरकुलांना व त्यांच्या वसाहती अंतर्गत रस्ते, ड्रेनेज व्यवस्था, पथदिवे. इत्यादी मूलभूत सुविधा द्याव्यात,
९. घरकुल लाभार्थ्यांना मूलभूत सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी पंचायत समिती सेसफंड व **१५** वा वित्त आयोग यातून निधीची व्यवस्था करणे करिता प्रयत्न करावा.

या अभियानामध्ये आपण केलेल्या कामाचे मुल्यमापन करण्यात येऊन उत्कृष्ठ काम करणा-या जिल्हयांना, तालुक्यांना व ग्रामपंचायतीना राज्य स्तरावरुन पुरस्कार देण्यात येणार आहेत. यास्तव हा पुरस्कार मिळवून आपल्या जिल्हयाचे नाव उंचावण्याची संधी तुम्हांस या निमित्ताने मिळत आहे. त्याचे आपण सोने कराल याची खात्री वाटते.

**"अभियान यशस्वी होणेकरिता आपणांस मन पूर्वक शुभेच्छा"!**

**(अजित पवार)**

**प्रति,**
**श्री/श्रीमती.** ---------------
**अध्यक्ष, जिल्हा परिषद,**------------

# मा. मंत्री, ग्राम विकास यांचे सरपंच यांना अभियानात सक्रीय सहभाग देणेबाबत पत्र

मंत्री
महाराष्ट्र राज्य



**मंत्री**
**ग्रामविकास व कामगार**
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

**विषय -" महा आवास अभियान - ग्रामीण-२" मध्ये सक्रीय सहभाग देणेबाबत...**

आपणास अवगतच आहे की, सर्वांसाठी घरे - २०२२ या शासनाच्या धोरणांतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतीमान करणे व त्यामध्ये गुणवत्ता आणणे यासाठी राज्यात दि. २० नोव्हेंबर, २०२० ते ५ जुन २०२१ या कालावधीत महा आवास अभियान राबविण्यात आले. अभियानास उत्तम प्रतिसाद लाभला असून, अभियान यशस्वी होणेमध्ये आपला सहभाग निश्चितच अमूल्य असा आहे. अभियान चळवळ अशीच पुढे नेण्याच्या हेतूने, यावर्षी देखिल दि. २० नोव्हेंबर २०२१ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत "महा आवास अभियान ग्रामीण-२" राज्यात राबविण्याचा संकल्प ग्राम विकास विभागाने केला आहे.

सरपंच व ग्रामसेवक हा ग्राम विकासाचा कणा आहे. ग्रामीण भागासाठीच्या प्रत्येक योजनेची अंमलबजावणी आपल्या शिवाय होऊच शकत नाही. आणि त्यामुळेच या अभियानामध्ये आपली भूमिका अतिशय महत्त्वाची आणि निर्णायक असणार आहे, त्यासाठी अभियान कालावधीमध्ये राबवण्याच्या विविध उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आपण आपला सक्रीय सहभाग पुढीलप्रमाणे नोंदवावा.

१. महा आवास अभियान- ग्रामीणची आपल्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामस्तरीय कार्यशाळा आयोजित करुन लाभार्थी व ग्रामस्थांची क्षमता बाधंणी करणे.
२. ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व लाभार्थी यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करुन गावातील कामाचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण करणेसाठी तसेच अभियान १०० टक्के यशस्वी करण्यासाठी ग्राम कृती गटाचे गठन करणे.
३. गावात लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांच्या बैठका, मेळावे आयोजित करुन घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन, प्रोत्साहन देणे तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण करणे, घरकुलाचे भुमिपुजन कार्यक्रम, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम, गृहप्रवेश कार्यक्रम, इ. कार्यक्रम आयोजित करणे.
४. गावामध्ये बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करणे.
५. भुमिहिन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध मार्गाने उपलब्ध होणाऱ्या जागांची लॅण्ड बँक तयार करणे. तसेच वाळू उपलब्धतेसाठी सॅण्ड बँकची निर्मिती करणे.
६. तसेच सर्व घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या इतर योजनांचा लाभ मिळवून देऊन शासन निर्णयातील परिशिष्टात दिलेल्या निकषावर काम करुन आपली ग्रामपंचायत राज्यस्तरावरील पुरस्कारासाठी पात्र ठरावी यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.
७. अभियानाची योग्य प्रकारे प्रचार व प्रसिध्दी करणे या करिता माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांचा यथोचित वापर करावा.

आपणास माहित असेल की, समाजातील अनेक व्यक्ती किंवा संस्था स्वत:चे योगदान देऊन तसेच आर्थिक झळ सोसून अशा प्रकारे समाजसेवा करण्याची संधी शोधत असतात. मात्र आपण निश्चितच भाग्यवान आहात, की ग्रामीण भागातील गोरगरीब, दीनदुबळ्या जनतेची सेवा अशा प्रकारच्या शासकीय योजनेद्वारे आपल्या हातून आयतीच घडत आहे, आणि ती देखील कोणतीही वैयक्तिक झळ न सोसता! ही जाणीव ठेऊनच आपण सदर अभियाना दरम्यान आपणास दिलेले संपूर्ण उद्दिष्ट पूर्ण कराल याची मला खात्री आहे. याही वेळी आपण अथक परिश्रम करुन आपल्या ग्रामपंचायतीस पुरस्कार मिळवून द्याल, असा विश्वास वाटतो.

**महा आवास अभियान-ग्रामीणच्या यशस्वीतेसाठी आपणास माझ्याकडून मन:पूर्वक शुभेच्छा..!**

**(हसन मुश्रीफ)**

**प्रति,**
**श्री/श्रीम**.................................................
**सरपंच, ग्रामपंचायत** ..............................

## मा. राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल यांचे तलाठी यांना अभियानात सक्रीय सहभाग देणेबाबतचे पत्र



राज्यमंत्री
महसूल, ग्रामविकास, बंदरे,
खार जमिनी विकास, विशेष सहाय्य
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
Email : statemin.revrdd@gmail.com

**विषय :- 'महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२' च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सक्रिय सहभाग देणेबाबत.**

महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहूजन कल्याण विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बेघरांना घर देण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार ग्रामीण आवास योजना अशा अनेक योजना राबवित आहे. या ग्रामीण गृहनिर्माण योजनांबरोबरच जागा नसलेल्या लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा विनामुल्य उपलब्ध करुन देणे व अतिक्रमणे नियमानुकूल करणे या योजना राबवण्यात येत आहेत.

राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात सुरु असलेल्या कामास अधिक गती देण्यासाठी, त्यातील गुणवत्तावाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२१ ते ३१ मार्च २०२२ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या '**महा आवास अभियान- ग्रामीण २०२१-२२**' चे आयोजन करण्यात आले असून या अभियानाचा शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे माननीय मंत्री, ग्राम विकास महोदय यांच्या हस्ते दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी झाला आहे. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करुन अभियान यशस्वी करण्याचे आवाहन माननीय मंत्री, ग्राम विकास महोदय यांनी केले आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी आपण सक्रिय सहभाग दर्शवाल याची मला खात्री आहे.

अभियान कालावधीत ग्रामीण गृहनिर्माण योजना संबंधित अनेक उपक्रम राबविले जात असून या सर्व उपक्रमांप्रमाणेच खालील उपक्रमांमध्ये आपला पुढाकार महत्वपूर्ण राहील :-

१. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर **विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची 'लॅण्ड बँक' तयार करणे.**
२. गावठाणाबाहेरील अतिक्रमणे नियमानुकूल करणे.
३. सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद गटात किमान एक याप्रमाणे '**सॅण्ड बँक' ची निर्मिती करणे.**
४. **प्रधानमंत्री उज्ज्वला योजने** मधून ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे लाभार्थी यांना गॅस जोडणी उपलब्ध करुन देणे.
५. गरजे प्रमाणे इच्छूक लाभार्थ्यांना वित्तीय संस्थांकडून गृहकर्ज मिळवून देणे.
६. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांना विहीत कालावधीत घरकुल बांधून पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन करणे तसेच प्रोत्साहित करणे.

चांगले काम करणाऱ्यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कामाचा गौरव करण्यात येणार आहे. आपण पुरस्कार विजेते ठरुन आपल्या विभागाचे, कार्यालयाचे, गावाचे तसेच तालुक्याचे नाव उंचावण्याची संधी सोडणार नाही याची मला खात्री वाटते.

"**महा आवास अभियान- ग्रामीण**" च्या यशस्वी वाटचालीसाठी माझ्याकडून मन:पूर्वक शुभेच्छा!

**( अब्दुल सत्तार )**

प्रति,
श्री/श्रीमती ----------------
तलाठी, सजा --------------

## मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे विभागीय आयुक्त यांना अभियानात सक्रीय सहभाग देणेबाबतचे पत्र

देबाशिष चक्रवर्ती
मुख्य सचिव

संचिका-२५४/२०२१-२२
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
(ग्रामविकास विभाग)
दक्षिण कक्ष, सिडको भवन,
सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
दिनांक — २४ फेब्रुवारी, २०२२



**विषय :- महा आवास अभियान - २०२१-२२ मध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत.**

"सर्वांसाठी घरे २०२२" हे केंद्र शासनाचे धोरण असून राज्य शासनानेदेखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण तसेच रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम विकास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व अटल बांधकाम कामगार विकास योजना इत्यादी राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. या धोरणाच्या अनुषंगाने पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमणे नियमानुकूल करणे व लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करुन देणे अशा प्रकारचे पूरक कार्यक्रमसुध्दा राज्यात राबविण्यात येत आहेत.

राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणणेसाठी दि. २० नोव्हेंबर, २०२० ते दि. ०५ जुन, २०२१ या कालावधीत महा आवास अभियान राबविण्यात आले. राज्यात सदर महा आवास अभियान राज्यात राबविताना आपण व आपल्या अधिनस्त संबंधित यंत्रणेचे सक्रिय सहभाग घेवून हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले त्याबद्दल आपले व आपल्या सहकाऱ्यांचे अभिनंदन!

ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत विविध योजनांची अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी तसेच मागील वर्षी महा आवास अभियानला प्राप्त झालेला प्रतिसाद विचारात घेवून राज्य शासनाने महा आवास अभियान 2.0 दि.20 नोव्हेंबर 2021 पासून राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानात उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, कर्मचारी इत्यादींना राज्य/ विभाग/ जिल्हा/ तालुका स्तरावरुन पुरस्कार देण्यात येणार आहेत.

महा आवास अभियान अंतर्गत करावयाच्या उपक्रमांबाबतची माहिती वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली आहे. त्यानुसार या अभियानांतर्गत ग्रामीण गृहनिर्माणशी संबंधित केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अंमलबजावणी मिशन मोडमध्ये करावयाची आहे. त्यानुषंगाने **अभियानाच्या शासन निर्णयात दिल्याप्रमाणे प्रामुख्याने १० उपक्रमांवर विशेष लक्ष देवून पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी**.

१. सदर अभियान यशस्विपणे राबविण्यासाठी ग्रामीण गृहनिर्माण हा विषय आपले विषयपत्रिकेवर अग्रक्रमाने घ्यावा.
२. विभागीय टास्क फोर्सचे अध्यक्ष या नात्यानेविभागातील भूमिहीन घरकुल लाभार्थ्यांना जागा देण्यासाठी युध्दपातळीवर कार्यवाही करावी.
३. गतिमान घरकुल बांधणीसाठी लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध होणेसाठी महसूल यंत्रणेस (जिल्हाधिकारी/प्रांत अधिकारी/ तहसिलदार/ तलाठी) सूचित करावे.
४. महा आवास अभियानाचा नियमित साप्ताहीक आढावा घेऊन संबंधितांना मार्गदर्शन करावे.
५. या अभियानांतर्गत राबवावयाचे उपक्रम हे ग्राम विकास विभाग, महसूल विभाग व इतर विभागांशी संबंधित असून त्या विभागांमध्ये समन्वय साधावा.

तरी आपल्या मार्गदर्शनाखाली महा आवास अभियान - 2021-22 यशस्वीरित्या राबविण्याबाबत आपण व्यक्तीश: लक्ष घालून आपला विभाग राज्यात प्रथम पुरस्कार प्राप्त करील यासाठी प्रयत्न करावेत, शुभेच्छांसह..!

**देबाशिष चक्रवर्ती**, भा.प्र.से.

**प्रति,**
**विभागीय आयुक्त (सर्व)**

## मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अभियानात सक्रीय सहभाग देणेबाबतचे पत्र



राजेश कुमार
अपर मुख्य सचिव

क्रमांक : प्रआयो-२०२२/प्र.क्र.३२/यो-१०
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई ४०० ००१,
दिनांक:- १० फेब्रुवारी, २०२२ .

**विषय :- महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२ मध्ये सक्रीय सहभाग घेण्याबाबत...**

"सर्वांसाठी घरे-२०२२" हे केंद्र शासनाचे धोरण असून राज्य शासनानेदेखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम विकास योजना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व अटल बांधकाम कामगार विकास योजना इत्यादी राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. या धोरणाच्या अनुषंगाने पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमणे नियमानुकूल करणे व लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून देणे अशा प्रकारचे पूरक कार्यक्रमसुध्दा राज्यात राबविण्यात येत आहेत.

ग्रामीण गृहनिर्माणचे धोरण राबविताना घरकुलांच्या कामाची प्रगती संख्यात्मक न राहता गुणात्मक राहावी, तसेच नाविन्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधायुक्त असे घरकुल उपलब्ध करुन दयावे, त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तीस सक्षमपणे सामोरे जाणारे घरकुल बांधण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा या बाबी प्रकर्षाने विचारात घेण्यात येत आहेत.

केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजना या आपल्या कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहेत. त्यानुसार महा आवास ग्रामीण अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमामध्ये आपला व आपल्या कार्यालयाचा सक्रीय सहभाग अत्यंत आवश्यक आहे. आतापर्यंत ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रम आपण व आपल्या अधिनस्त संबंधित सहकाऱ्यांनी सक्रीय सहभाग घेवून यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणणेसाठी दि. २० नोव्हेंबर, २०२० ते दि. ०५ जुन, २०२१ या कालावधीत महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात आले. राज्यात सदर महा आवास अभियान-ग्रामीण राबविताना आपण व आपले अधिनस्त संबंधित सहकार्यांना सक्रिय सहभाग देवून हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले त्याबद्दल आपले व आपल्या सहकार्यांचे अभिनंदन..!

**१०. ग्रामीण गृहनिर्माण योजनांचया अंमलबजावणीमध्ये गतिमाणता व गुणवत्ता येण्यासाठी राज्यात प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये किमान एक बहुमजली गृहसंकुले (हाऊसींग अपार्टमेंट) उभारणे आणि त्याची सहकारी संस्थापन करणे. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत स्तरावर लॅण्ड बँक व सॅण्ड बँक ची निर्मिती करणे. तसेच घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनविन, किफायतशीर, नैसर्गिक आपत्ती रोधक बांधकाम तंत्रज्ञानासह घरकुल बांधकामामध्ये फर्शी, लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/ परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौर ऊर्जा साधणे व नेट बिलींग इ. चा वापर करणे.**

या अभियानात उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, कर्मचारी इत्यादींना राज्य/ विभाग/ जिल्हा/ तालुका स्तरावरुन पुरस्कार देण्यात येणार आहेत. या संदर्भात पुरस्कार प्राप्त करून घेण्यासाठी सक्रिय सहभाग आवश्यक आहे. "सर्वांसाठी घरे-२०२२" या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करण्यासाठी व सदर अभियान यशस्वी करण्यासाठी आपण व्यक्तीश: लक्ष घालावे.

**राजेश कुमार**, भा.प्र.से.
**अतिरिक्त मुख्य सचिव**
**ग्राम विकास व पंचायत राज विभाग**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
**अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा**
**मख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद (सर्व)**

## मा. प्रधानमंत्री, भारत सरकार, श्री. नरेंद्र मोदी यांच्याकडून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण डॅश बोर्ड बाबत क्षमता बांधणी

दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण डॅश बोर्डचे उद्‌घाटन देशाचे मा. प्रधानमंत्री, श्री. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते दूरदृष्य प्रणालीव्दारे करण्यात आले. या डॅश बोर्डच्या माध्यमातून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण लाभार्थी निवड, घरकुल मंजूरी, घरकुल बांधकामासाठी देय हप्त्यांची सद्यस्थिती, घरकुल बांधकामाची प्रगती व इतर घरकुल सबंधी माहिती 'घरकुल लाभार्थ्यांसह सर्व सामान्य जनतेला मिळणार आहे. या डॅश बोर्डची निर्मिती भारत सरकारच्या ग्रामीण विकास विभागाने केली आहे.

या डॅश बोर्डच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलतांना देशाचे मा. प्रधानमंत्री महोदयांनी सांगितले की, सदरचे डॅश बोर्ड हे सर्व सामान्य जनतेसाठी असून हे अत्यंत उपयुक्त आहे. या डॅश बोर्डमुळे घरकुल लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी व त्यांना देय हप्त्याची सर्व माहिती मिळणार असून त्यांना मिळणारे हप्ते व घरकुल मंजूरी बाबत सद्यस्थितीत याबाबत कोणालाही विचारणा करावी लागणार नाही. यामुळे घरकुल मंजूरी व लाभार्थ्यांना देय हप्ते संबंधी तक्रारीचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार असल्याचे मा. प्रधानमंत्री महोदयांनी सांगितले. या डॅश बोर्डमुळे ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पारदर्शकता येणार असल्याचेही मा. प्रधानमंत्री महोदयांनी सांगितले. या डॅश बोर्डचा वापर व उपयोग याबाबत मा. प्रधानमंत्री महोदयांनी सविस्तर माहिती देत सर्व उपस्थितांची डॅश बोर्ड बाबत क्षमता बांधणी केली आहे. या डॅश बोर्डची लिंक सर्व सामान्य जनतेला लवकर देणार असल्याचेही मा. प्रधानमंत्री महोदयांनी सांगितले.

यावेळी महाराष्ट्र राज्यातून मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्यासह ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणारे भागधारक, ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक दूरदृष्य प्रणालीव्दारे उपस्थितीत होते.



## महा आवास अभियान ग्रामीण २.० प्रभावी अंमलबजावणी व्हावी

**- मा. पालकमंत्री, नांदेड जिल्हा, श्री. अशोक चव्हाण**

महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणी व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांच्या क्षमताबांधणीसाठी दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी राज्याचे मा. मंत्री, सार्वानिक बांधकाम तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अशोक चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली अभियानाची क्षमताबांधणी कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेस जिल्हा परिषद अध्यक्षा, श्रीमती मांगराणी अंबुलगेकर, जिल्हाधिकारी, डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषद मुकाअ श्रीमती वर्षा ठाकुर, पोलीस अधिक्षक श्री. प्रमोद शेवाळे, मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने, शिक्षणाधिकारी श्री. प्रशांत दिग्रसकर, प्रकल्प संचालक व्ही. आर. पाटील त्यासोबतच इतर सन्माननीय लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थितीत होते.

ग्रामीण भागातील स्वतःच्या घरापासून वंचित असलेल्या नागरिकांना स्वतःच्या हक्काचे घरकुल मिळावे यासाठी महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत जिल्ह्यात महा आवास अभियानाची अंमलबजावणी प्रभावीपणे झाली पाहिजे. या दृष्टीने ग्रामीण गृहनिर्माण योजनांशी पुरक समन्वय साधत सूक्ष्म नियोजन करून त्याला अधिक प्राधान्य द्यावे, असे स्पष्ट निर्देश मा. मंत्री, सार्वानिक बांधकाम तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी दिले.



## घरकुलाची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शनासाठी लोकप्रतिनिधींच्या हस्ते डेमो हाऊसेसचे लोकार्पन

महा आवास अभियान-ग्रामीण टप्पा-१ व टप्पा-२ अंतर्गत जवळपास सर्वच तालुक्यांमध्ये डेमो हाऊसेस उभारणीचे काम पूर्णत्वास आले आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मागदर्शक ठरण्यासाठी राज्यातील सर्व पंचायत समिती आवारामध्ये डेमो हाऊसेसची उभारणी करण्यात आली. पूर्ण झालेल्या या डेमो हाऊसेसचे लोकार्पण लोकप्रतिनिधींच्या हस्ते करण्यात आले आहे.

यामध्ये दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. जयंत पाटील यांचे शुभहस्ते व मा.आमदार, श्री. मानसिंगराव नाईक यांचे प्रमुख उपस्थितीत पंचायत समिती शिराळा येथील डेमो हाऊसचे लोकार्पण करण्यात आले. त्याचप्रमाणे दिनांक ०६ जानेवारी, २०२२ रोजी मा. आमदार, श्री. राजेश पाटील यांच्या हस्ते पंचायत समिती गडहिंग्लज येथील डेमो हाऊसचे लोकार्पण करण्यात आले. दिनांक ११ जानेवारी, २०२२ रोजी मा. आमदार सुनील अण्णा शेळके यांचे हस्ते पंचायत समिती मावळ येथील डेमो हाऊसचे लोकार्पण करण्यात आले. दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ रोजी मा.आमदार, श्री. संजिव रेड्डी बोडकुरवार हस्ते यवतमाळ जिल्ह्यातील पंचायत समिती वणी येथील डेमो हाऊसचे लोकार्पण करण्यात आले. त्याचप्रमाणे इतरही ठिकाणी डेमो हाऊसेसचे लोकार्पण मा. मंत्री, मा. खासदार, मा. आमदार, मा. जि.प. अध्यक्ष, पंचायत समिती सभापती, लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले व येत आहे.






## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृह निर्माण कार्यालयाच्या अधिकाऱ्यांकडून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे येथील अधिकारी/कर्मचारी यांची जागा उपलब्धतेबाबत क्षमता बांधणी

दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे उपसंचालक (प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण), श्री.नीलेश काळे, राज्य समन्वयक श्री. राम आघाव व प्रशिक्षण समन्वयक (जागा) श्री. मधुकर वाघ यांनी जिल्हा विकास यंत्रणा ठाणे कार्यालयाला भेट दिली. यावेळी ठाणे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती छायादेवी शिरसोदे व ठाणे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या भेटी दरम्यान राज्य व्यवस्थापन कक्षाच्या अधिकाऱ्यांनी महा आवास अभियान ग्रामीण २.० अंतर्गत १ ते १० उपक्रमांचा आढावा घेतला. तसेच ठाणे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या जागे विषयी अडचणी समजून ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना व इतर मार्ग उदा. बक्षीसपत्र, भाडेपट्टा, इ. श्री. नीलेश काळे व श्री.मधूकर वाघ यांनी मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे आवास प्लस संबंधीत तांत्रिक अडचणी बाबत श्री. राम आघाव यांनी जिल्हास्तरीय यंत्रणेला मार्गदर्शन केले.



## महाआवास अभियान-ग्रामीण २.० मध्ये ५ लाख घरकुले बांधण्याचा दृढनिश्चय

**- मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ**

दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२२ रोजी मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली व सहसचिव, ग्रामविकास विभाग, श्री. मंगेश मोहिते व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या उपस्थितीत महा आवास अभियान २.० ची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीस राज्यातील सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्तालयाचे उपआयुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी हे दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. ग्रामीण भागातील सामान्य गोरगरीब जनतेला स्वतःच्या हक्काचे छत मिळावे यासाठी महा आवास अभियान २.० मध्ये ५ लाख घरकुले बांधण्याचे दृढनिश्चय करू अशा सूचना मा. मंत्री महोदयांनी केल्या.

यावेळी डॉ. राजाराम दिघे यांनी महा आवास अभियान २.० अंतर्गत १ ते १० उपक्रमांच्या प्रगती बाबत सादरीकरण केले. त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या कायमस्वरूपी प्रदतिक्षा यादी (PWL) मधील उर्वरित ८०,३७२ लाभार्थ्यांची मंजूरी प्रक्रीया तात्काळ पूर्ण करावी. PWL मधील उर्वरित भूमिहीन ५६,४६४ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. महा आवास अभियान २.० मध्ये गुणात्मक व संख्यात्मक बदल करण्यासाठी काही नाविन्यपूण उपक्रम जसे लँड बँक, सँड बँक, बहुमजली गृह संकुले (हाऊसिंग अपार्टमेंट) या बाबींचा समावेश करण्यात आला असून यामध्ये प्राधान्याने लक्ष द्यावे. घरकुल मंजूरीनंतर पहिला हप्ता वितरीत करण्याचा सध्याचा सरासरी कालावधी ५९ दिवसाचा असून ७ दिवसावर आणावयाचा आहे. मंजूरीनंतर घरकुल पूर्णत्वाचा सरासरी कालावधी ३६५ दिवसावरून ११० ते १२० दिवसांचा करावयाचा आहे. दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ हा **'घरकुल मंजूरी दिवस'** ठेवण्यात येत असून या तारखेपर्यंत आवास प्लस मधील लाभार्थी मंजूरीची प्रक्रीया १०० टक्के पूर्ण करावी. अशा सूचना मा. मंत्री महोदयांनी सर्व उपस्थितांना केल्या. सर्व अपूर्ण घरकुले मार्च, २०२२ पर्यंत पूर्ण करणेकामी सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंते व ग्रामसेवक यांना कालबध्द कार्यक्रम देण्याचे निर्देश देत दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजी याबाबत आढावा घेणार असल्याचे मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांनी सांगितले.



## महाआवास अभियान २.० मध्ये घरकुल बांधकामात जागा व वाळूची अडचण येणार नाही

**- मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार**

दि. ०४ फेब्रुवारी, २०२२ रोजी मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या उपस्थितीत महा आवास अभियान-ग्रामीण २.० आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक दूरदृष्य प्रणाली व्दारे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये डॉ. राजाराम दिघे यांनी महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत १ ते १० उपक्रमाचे सादरीकरण केले. मा. राज्यमंत्री महोदयांनी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा घरकुल बांधकामासाठी जागा व वाळू उपलब्धतेबाबत उपाययोजनांचा आढावा घेतला. अभियान कालावधीत गरिब, गरजू व भूमिहीन लाभार्थ्यांना पक्के घरकुल देणे ही आपली जबाबदारी असून त्याकरीता जागा व वाळू उपलब्धतेबाबत सर्व अडचणी दूर करू असे आश्वासन मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल, श्री. अब्दुल सत्तार यांनी बैठकीला उपस्थितांना दिले.



# महा आवास अभियान २.० च्या यशस्वतेसाठी प्रभावी संनियंत्रण व मूल्यमापन गरजेचे

**- मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार**

दिनांक १३ व २१ जानेवारी तसेच १८ फेब्रुवारी, २०२२ रोजी मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या उपस्थितीत महा आवास अभियान-ग्रामीण २.० च्या आढावा बैठका घेण्यात झाल्या. या बैठकांना जिल्हा परिषदेचे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) दूरदृष्य प्रणालीव्दारे उपस्थिती होते.

याबैठकांमध्ये महा आवास अभियान-ग्रामीण २.० च्या १ ते १० उपक्रमांचे सादरीकरण डॉ. राजाराम दिघे यांनी केले. मा. अतिरिक्त मुख्य सचिव यांनी महा आवास अभियान-ग्रामीण २.० अंतर्गत १ ते १० उपक्रमांचा व स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत विविध उपक्रमांचा जिल्हानिहाय आढावा घेतला. त्यानुसार घरकुलांना विनाविलंब मंजूरी द्यावी. मंजूर घरकुलांना तात्काळ पहिल्या हप्त्याचे वितरण करावे. घरकुल बांधकामाचा वेग वाढवून सरासरी कालावधी ३६५ दिवसावरून ११० ते १२० दिवसांचा करावा. भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता करून अभियान कालावधीत जास्तीत जास्त घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्याच्या सूचना मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना केल्या. तसेच अभियानाच्या यशस्वीतेसाठी प्रभावी संनियंत्रण व मूल्यमापन गरजेचे असल्याचे मा. अतिरिक्त मुख्य सचिव यांनी सांगितले.



# लॅण्ड बँक व सॅण्ड बँक सारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी देशभरात व्हावी

**- संचालक (ग्रामीण गृहनिर्माण), भारत सरकार, श्री. चंदेर शेखर**

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्र राज्याचा आढावा घेण्यासाठी केंद्र शासनाचे संचालक (ग्रामीण गृहनिर्माण) श्री. चंदेर शेखर यांनी दिनांक २३ व २४ फेब्रुवारी, २०२२ रोजी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय, नवी मुंबई येथे भेट दिली. या दोन दिवसीय दौरा कार्यक्रमा दरम्यान श्री. चंदेर शेखर यांनी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक, डॉ. राजाराम दिघे व राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी यांचेशी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व आवास प्लस बाबत विविध विषयांवर चर्चा केली. तसेच दूरदृष्य प्रणालीव्दारे महाराष्ट्रातील सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक यांचा आढावा घेतला.

दिनांक २३ फेब्रुवारी, २०२२ रोजी श्री. चंदेर शेखर यांनी डॉ. राजाराम दिघे व राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी यांच्या समवेत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धता, आवास प्लस मधील प्रगती अहवाल, घरकुलांना इलेक्ट्रीफीकेशन्स करीता निधीची उपलब्धता, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रम गुणांकन पध्दती, केंद्र व राज्य पुरस्कृत योजना मधील कृती संगम आवास प्लस मधील अडचणी, फोटो अपलोड बाबत अडचणी तसेच राज्यात राबवित असलेले महा आवास अभियान-ग्रामीण २.० व त्या अंतर्गत राबविण्यात येत असलेले नाविन्यपूर्ण उपक्रम या विषयांवर चर्चा केली.

डॉ. राजाराम दिघे यांनी श्री. चंदेर शेखर यांना अभियानात सक्रीय सहभाग घेण्यासाठी मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री, मा. मंत्री (ग्रामविकास), मा.राज्यमंत्री (ग्रामविकास व महसूल), मा. मुख्य सचिव व मा.अतिरिक्त मुख्य सचिव (ग्रामविकास व पंचायत राज विभाग) यांनी लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकारी यांना



दिलेली पत्र, अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी तयार करण्यात आलेले माहिती, शिक्षण व संवाद साहित्य पोस्टर, घडी पुस्तिका, मार्गदर्शक पुस्तिका, महा आवास त्रैमासिकाचे अंक, दिनदर्शिका, यशोगाथा पुस्तिका दैनंदिनी २०२२, महा आवास पुरस्काराचे सन्मानचिन्ह दाखविले व त्यांना राज्य व्यवस्थापन कक्षाची दैनंदिनी भेट केली.

दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ रोजी श्री. चंदेर शेखर यांनी डॉ. राजाराम दिघे व राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी यांच्या उपस्थितीत राज्यातील सर्व प्रकल्प संचालक यांची दूरदृष्य प्रणालीव्दारे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणची आढावा बैठक घेतली. महा आवास अभियान-ग्रामीण २.० अंतर्गत लॅण्ड बँक व सॅण्ड बँक हे उपक्रम कौतुकास्पद असून अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी संपूर्ण देशात व्हावी यासाठी मी केंद्र शासनाकडे विषय मांडणार असल्याचेही श्री. चंदेर शेखर यांनी सांगितले.



## राज्य व्यवस्थापन कक्षाच्या विभागीय संपर्क अधिकाऱ्यांकडून औरंगाबाद, अमरावती व नाशिक विभागातील महा आवास अभियान २.० च्या कामांची पाहणी

राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ पासून महा आवास अभियान-ग्रामीण २.० राबविण्यात येत आहे. या अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी राज्यस्तरावरून ६ महसूली विभागाकरीता राज्य व्यवस्थापन कक्षातील ६ अधिकाऱ्यांची विभागीय संपर्क अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. त्यानुसार औरंगाबाद विभागाचे संपर्क अधिकारी श्री. राम आघाव यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी बीड जिल्ह्याचा, अमरावती विभागाचे संपर्क अधिकारी श्री.मधुकर वाघ यांनी दिनांक २२, २३ व २४ फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत अनुक्रमे अमरावती, यवतमाळ व वाशिम जिल्ह्यांचा व नाशिक विभागाचे संपर्क अधिकारी श्री. संतोष पानसरे यांनी दिनांक २३, २४ व २५ फेब्रुवारी, या कालावधीत अनुक्रमे नाशिक, जळगांव व धुळे जिल्ह्यांचा दौरा केला.

या दौरा कार्यक्रमा दरम्यान सर्व विभागीय संपर्क अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक यांच्या प्रमुख उपस्थितीत महा आवास अभियान २.० अंतर्गत विविध उपक्रमांचा आढावा घेतला. या बैठकीला जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विभागीय प्रोग्रामर, जिल्हा प्रोग्रामर, जिल्हा व तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते व सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. तसेच श्री. राम आघाव यांनी आवास प्लस संबंधी तांत्रिक अडचणी बाबत मार्गदर्शन केले.



श्री.मधुकर वाघ यांनी चांदुर बाजार व पुसद पंचायत समिती परिसरातील डेमो हाउसची पहाणी केली. तसेच अमरावती जिल्ह्यातील ग्रामपंचायत फुबगाव सैदापुर, यवतमाळ जिल्हातील माणिकडोह व वाशिम जिल्ह्यातील जांभरून नावजी व वाळकी ग्रामपंचायतींना क्षेत्रीय भेटी देवून घरकुलांची पहाणी करत लाभार्थी व ग्रामस्थ यांना विविध ग्रामीण आवास योजनांबाबत मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर महा आवास अभियान २.० च्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी लावण्यात आलेले होर्डिंग, बॅनर व पोस्टर इ. माहिती, शिक्षण व संवाद साहित्याची तपासणी श्री. मधुकर वाघ यांनी केली.

श्री. संतोष पानसरे यांनी नाशिक जिल्ह्यातील देवळा व सटाणा येथे डेमो हाऊसची पहाणी केली. नाशिक, जळगाव व धुळे जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना भेटी देवून गृह संकुल, मेसन ट्रेनिंग अंतर्गत पूर्ण केलेली घरकुले व लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.




## अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या बैठका

महा आवास अभियान-ग्रामीण २.० च्या प्रभावी अंमलबाावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली माहे जानेवारी, फेब्रुवारी व मार्च २०२२ या महिन्यांमध्ये विभागीय आयुक्तालयाचे उपायुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या दूरदृष्य प्रणाली व्दारे नियमित आढावा बैठका घेण्यात आल्या.

या बैठकामध्ये महा आवास अभियान-ग्रामीण २.० अंतर्गत १ ते १० उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. यावेळी डॉ. राजाराम दिघे यांनी अभियान क्षमता बांधणी कार्यशाळांचे तात्काळ आयोजन करणे, अभियानाच्या यशस्वीतेसाठी ग्राम कृती गटाचे गठण, लाभार्थी मेळाव्याचे आयोजन करणे, अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी माहिती, शिक्षण व संवाद साहित्याचा यथोचित वापर करण्याच्या सूचना केल्या.

त्याचप्रमाणे याबैठकांमध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावाही डॉ. राजाराम दिघे यांनी घेतला. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भुमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धता, घरकुलांच्या उद्दिष्टानुसार १०० टक्के घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे, आवास प्लस (ड यादी) मधील कुटूंबांचे १०० टक्के आधार सिडिंग व जॉब कार्ड मॅपिंग पूर्ण करून प्राधान्यक्रम यादी तयार करणे व उद्दिष्टानुसार मंजूरी देवून घरकुले पूर्ण करणे, राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात गुणवत्ता आणण्यासाठी नवनवीन संकल्पना राबविणे व महा आवास अभियान-ग्रामीण २.० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना डॉ. राजाराम दिघे यांनी सर्व नोडल अधिकारी यांना केल्या.



## महा आवास अभियान २.० च्या कामात दिरंगाई करणाऱ्यावर कठोर कारवाई

**- श्री रघुनाथ गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार**

महा आवास अभियाना २.० च्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमानासाठी नंदुरबार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली सलग दिनांक २, ३ व ४ मार्च २०२२ रोजी महा आवास अभियान २.० च्या ग्रामपंचायत निहाय आढावा बैठका घेण्यात आल्या.

या बैठकांना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. आर. पी. पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रमोद पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि./पा. व स्व.) डॉ.वर्षा पडोळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) श्री. राजेंद्र पाटील, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, जिल्हा प्रोग्रामर, जिल्हा/तालुक्यातील डेटा एन्ट्री ऑपरेटर, जिल्हा परिषद व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे सर्व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकांमध्ये श्री. रघुनाथ गावडे यांनी महा आवास अभियान २.० चे १० उपक्रम व सर्व घरकुल योजनांच्या कामांचा तालुका व ग्रामपंचायत निहाय आढावा घेतला. तसेच प्रधानमंत्री आवास योजना प्रपत्र (ब) यादी अंतर्गत ग्रामपंचायत निहाय आणि आवास प्लस बाबत संपूर्ण कार्यपद्धती सविस्तर मार्गदर्शन श्री.रघुनाथ गावडे यांनी केले.

अभियानात कमी कालावधीत गुणवत्तापूर्ण घरकुलांचे बांधकाम करण्यासाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न करावे. तसेच अभियान कालावधीत कामात दिरंगाई करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.रघुनाथ गावडे यांनी सांगितले.



## अभियानात अकोला जिल्हा विभागातच नाही तर राज्यात अव्वल स्थान पटकावणार

**- श्रीमती नीमा अरोरा, जिल्हाधिकारी, अकोला**

दिनांक १६ फेब्रुवारी, २०२२ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे महा आवास अभियान-ग्रामीण २.० ची आढावा सभा अकोला जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी, श्रीमती नीमा अरोरा यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सौरभ कटियार यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. या सभेला जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. सूरज गोहाड, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुभाष पवार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) श्री. बोटे, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, जिल्हा प्रोग्रामर, सर्व ग्राम सेवक, सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, सर्व डेटा एन्ट्री ऑपरेटर उपस्थित होते.

महा आवास अभियान-ग्रामीण २.० अंतर्गत १ ते १० उपक्रमांचे सादरीकरण प्रकल्प संचालक श्री. सूरज गोहाड यांनी केले. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सौरभ कटियार यांनी अभियानातील प्रगतीबाबत उपक्रम निहाय सर्व तालुक्यांचा आढावा घेतला. तसेच जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर येणाऱ्या अडचणी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

जिल्हाधिकारी श्रीमती नीमा अरोरा यांनी महा आवास अभियान २.० चा आढावा घेत महसूल विभागा संबंधित जागा व वाळू उपलब्धतेबाबत मार्गदर्शन केले. तसेच हे अभियान जिल्ह्यात यशस्वीपणे राबवून विभागातच नाही तर राज्यात अव्वल स्थान पटकावणार असा निर्धार सर्वांनी करावा, अशा सूचना श्रीमती नीमा अरोरा यांनी केल्या.



## महा आवास अभियान ग्रामीण २.० अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षणार्थ्यांचे मूल्यांकन पूर्ण

राज्यात घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून पूर्ण करुन कुशल गवंडी तयार करण्यात येत आहे. तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाच्या उद्दिष्टानुसार गवंडी प्रशिक्षण पूर्ण करुन त्यांचे मुल्यांकन(Assessment) पूर्ण करुन सदर माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत करण्यात येत आहे.

महा आवास अभियान-ग्रामीण २.० अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण व प्रशिक्षित गवंड्याचे मूल्यांकन करून प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल बनवून या पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेण्यात येत आहे. यामुळे अभियान कालावधीत मोठ्या प्रमाणात ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करून त्यांचे मूल्यांकन करण्यात येत आहे.

यामध्ये दिनांक १५ जानेवारी २०२२ रोजी ग्रामपंचायत मांगोळी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, ग्रामपंचायत कोगड, ता. जव्हार, जि. पालघर व दिनांक १६ जानेवारी २०२२ रोजी ग्रामपंचायत बऱ्हाणपूर सोमटे, ता. जि. पालघर, ग्रामपंचायत जळवंडी, ता. जुन्नर, जि. पुणे येथे गवंडी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या गवंड्यांचे मूल्यांकन पूर्ण करून त्यांची माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत करण्यात आली आहे.





# माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम

## अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम

राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण २.० च्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी विविध माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यावर्षी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांच्या संकल्पनेतून महा आवास अभियानाची माहिती देणारे नव वर्षाच्या शुभेच्छा पत्रकाचे वाटप सर्व भागधारकांना करण्यात आले.

तसेच अभियानाचे उद्देश, अभियानात राबविण्यात येणारे उपक्रम व अभियानात उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती किंवा संस्था यांना देण्यात येणारे महा आवास अभियान पुरस्कार याबाबत माहिती सांगणारे अभियानाचे होर्डिंग व पोस्टर विभाग, जिल्हा व तालुकास्तरावर दर्शनिय ठिकाणी प्रदर्शित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत स्तरावर अभियानाचे बॅनर व पोस्टर लावण्यात आले आहे. यामुळे अभियाना विषयी लाभार्थी व सर्व समान्य जनतेमध्ये प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृती होण्यास मदत होत आहे.

घरकुलाची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी पंचायत समिती स्तरावर डेमो हाऊसेसची निर्मिती करण्यात आली आहे. या डेमो हाऊसची निर्मिती करतांना त्या विभागाची स्थानिक भौगोलिक व नैसर्गिक परिस्थितीचा विचार करण्यात आला आहे. याच डेमो हाऊसेसची प्रतिकृती तयार करून सर्व ग्रामपंचायतीमध्ये ठेवण्यात आली आहे. दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी पंचायत समिती दक्षिण सोलापूर येथे जिल्हा परिषदेचे मूख्य कार्यकारी अधिकारी श्री. दिलीप स्वामी यांच्या हस्ते ग्रामपंचायतीस घरकूल प्रतिकृतीचे वाटप करण्यात आले.







## मुख्य कार्यकारी अधिकारी लातूर यांच्या हस्ते कॉप-शॉप चे उद्घाटन

दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी पंचायत समिती चाकूर कार्यालयाच्या आवारातील डेमो हाऊसमध्ये तालुकास्तरीय कॉप-शॉप (खरेदी विक्री केंद्र) सुरू करण्यात आले. या कॉप-शॉपचे उद्घाटन लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अभिनव गोयल यांनी केले. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रभू जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गिरी, चाकूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. वैजनाथ लोखंडे, श्री. अनंत कसबे, श्रीमती मुंढे, श्री. देवकुमार कांबळे, श्री. ईबुतवार, श्री. महादेव शेळके, श्री. विष्णू काळे, श्री. शिवाजी दराडे, श्री. तानाजी सोळुंके, सबंधित स्वंयंसहाय्यता बचत गटांच्या महिला, घरकुल लाभार्थी, ग्रामस्थ यांच्यासह जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पंचायत समिती,चाकूर येथील डेमो हाऊस मध्ये अंबिका स्वंयंसहाय्यता महिला बचत गटाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या तालुकास्तरीय कॉप-शॉप (खरेदी विक्री केंद्र) च्या उद्घाटन प्रसंगी बोलतांना श्री. अभिनव गोयल यांनी अंबिका स्वंयंसहाय्यता बचत गटाच्या महिलांचे अभिनंदन करून व्यवसाय वृद्धीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच जिल्ह्यात सर्व पंचायत समिती स्तरावरील डेमो हाऊसेस मध्ये येत्या कालावधीत कॉप-शॉप सुरू करण्यात येणार असल्याचे लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अभिनव गोयल यांनी सांगितले.



# विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी कोल्हापूर येथे जि.प. अध्यक्षांच्या शुभहस्ते डिजिटल डिस्प्लेचे उद्घाटन

राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण २.० अंतर्गत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांचा वापर करण्यात येत आहे. यामध्ये कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय चव्हाण यांच्या संकल्पनेतून जिल्हा परिषदेच्या मुख्य प्रवेश प्रवेशव्दारात डिजिटल डिस्प्ले लावण्यात आला आहे. या डिजिटल डिस्प्ले चे उद्घाटन दिनांक १९ जानेवारी २०२२ रोजी जिल्हा परिषदेचे लोकप्रिय मा.अध्यक्ष श्री. राहुल पाटील यांच्या शुभहस्ते केले.

या डिजिटल डिस्प्ले चा वापर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना तसेच जिल्हा परिषदेत मधील विविध विभागांच्या योजनांच्या प्रचार, प्रसिद्धी व जन-जागृतीसाठी करण्यात येणार आहे. या डिजिटल डिस्प्ले मुळे जिल्हा परिषद कार्यालयास भेट देणाऱ्या अभ्यागतांना जिल्हा परिषदे मार्फत राबविऱ्या सर्व योजनांची माहिती मिळावी हा त्यामागील उद्देश असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय चव्हाण यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष श्री.जयवंतराव शिंपी, बांधकाम व आरोग्य सभापती सौ.वंदना जाधव, श्री. बजरंग पाटील, श्री. सतीश पाटील, श्री. युवराज बापू पाटील, श्री. अरुण इंगवले, श्री. भगवान पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. माने, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. रवींद्र शिवदास, कार्यकारी अभियंता श्री. महेंद्र शिरसागर यांच्यासह जिल्हा परिषद व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे सर्व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.



# राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय प्रकाशित दैनंदिनी २०२२ वितरण

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना व महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत विविध माहिती, शिक्षण व संवाद उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येते. या उपक्रमांतर्गत गेल्या अभियानात दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली होती.

यावर्षी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत दैनंदिनी २०२२ प्रकाशित करण्यात आली असून या दैनंदिनी २०२२ मध्ये राज्यात राबविण्यात येणाऱ्या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची माहिती, राज्यात राबविण्यात येत असलेले महा आवास अभियान-ग्रामीण २.० ची माहिती, महाराष्ट्र राज्याचे मंत्री मंडळाची माहिती, मुख्य सचिवांसह मंत्रालयीन सर्व विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांची माहिती त्याचप्रमाणे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व सबंधित यंत्रणेचे अधिकारी यांची माहिती नाव, विभाग व दूरध्वनी क्रमांकासह अंतर्भुत आहे.

दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी जिल्हा परिषद रत्नागिरी येथे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती नंदिनी घाणेकर यांनी राज्य व्यवस्थापण कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या दैनंदिनी व माहे ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१ या कालावधीचा महा आवास त्रैमासिक अंक रत्नागिरी जिल्हा परिषदेमध्ये अध्यक्ष श्री. विक्रांत जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. इंदुराणी जाखड व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव यांना दिला. याप्रसंगी श्रीमती नंदिनी घाणेकर यांच्यासह जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा रत्नागिरी कार्यालयाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण बाबत केंद्र व राज्य शासनामध्ये समन्वय बैठका

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास व पंचायत राज विभागाकडून माहे जानेवारी ते मार्च २०२२ या दरम्यान मा. मंत्री, मा.राज्यमंत्री, मा. सचिव, मा. उप सचिव (ग्रामीण गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली सर्व राज्यांच्या दूरदृष्य प्रणालीव्दारे नियमित आढावा बैठकांचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये दिनांक २७ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. केंद्रीय मंत्री, ग्रामीण विकास व पंचायत राज, श्री. गिरीराज सिंह यांनी प्रधानमंत्री आवास योजन-ग्रामीण बाबत महाराष्ट्र राज्याचे मा.मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांच्याशी दूरदृष्य प्रणालीव्दारे चर्चा केली. यावेळी मा. मंत्री, ग्रामविकास यांच्यासह मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

त्याचप्रमाणे केंद्र शासनाकडून घेण्यात आलेल्या इतर बैठकांना महाराष्ट्र राज्याच्या वतीने संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते. या बैठकांमध्ये महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे घरकुल बांधकाम पूर्ण झालेल्या लाभार्थ्यांना शेवटच्या हप्त्यासोबत घरातील इलेक्ट्रीफीकेशन करीता अतिरिक्त निधी देण्याच्या प्रस्तावावर डॉ. राजाराम दिघे व मा. उप संचालक (ग्रामीण गृहनिर्माण), भारत सरकार श्री. गया प्रसाद यांच्यामध्ये सकारात्मक चर्चा झाली. त्याचप्रमाणे मा. सचिव, ग्रामीण विकास यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलांना मंजूरी व घरकुले पूर्ण करणे, भुमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता, प्रलंबित घरकुले पूर्ण करणे, घरकुल बांधकामाच्या प्रगतीसाठी संनियंत्रण व मुल्यमापन, घरकुलासंबंधी तक्रारी निवारण, आर्थिक प्रगती बाबत चर्चा व इतर घरकुल योजनासंबंधी आढावा घेण्यात आला.

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी महाराष्ट्र राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण २.० अंतर्गत प्रधानमंत्री आवास-योजना मध्ये गेल्यावर्षीपेक्षा जास्त घरकुले पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे सांगितले.



## ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या बळकटीकरणासाठी उद्योजकांनी पुढाकार घ्यावा

**- डॉ. राजाराम दिघे, मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्राम सामाजिक परिवर्तन फॉऊंडेशन**

दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्राम सामाजिक परिवर्तन फॉऊंडेशन, डॉ. राजाराम दिघे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या बळकटीकरणासाठी विविध उद्योजकांशी समन्वय बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये उपस्थित सर्व उद्योजकांना डॉ.राजाराम दिघे यांनी राज्यात राबवित असलेल्या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना व महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांबाबत सादरीकरणासह माहिती दिली. ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना मुलभूत नागरी सुविधा जसे - पक्के रस्ते, शुध्द पाणी, भूमिगत गटार व्यवस्था, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, पथ दिवे, सौर उर्जा त्यासोबतच घरकुल बांधकाम साहित्य, घरकुलांना रंगरंगोटी, परिसर स्वच्छता, उद्यान व इतर लोक उपयोगी सुविधा घरकुल लाभार्थ्यांना देवून ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या बळकटीकरणासाठी उद्योजकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन डॉ. राजाराम दिघे यांनी केले.



## घरकुल लाभार्थ्यांना शौचालयाचा लाभ देण्यासाठी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण व संचालक, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) यांच्या समन्वय बैठक

दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२२ रोजी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे व संचालक, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), श्री.रणधीर सोमवंशी यांच्यामध्ये ग्रामीण गृहनिर्माण योजनेच्या लाभार्थ्यांना प्राधान्याने शौचालयाचा लाभ मिळावा यासाठी समन्वय बैठक संपन्न झाली.

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. त्याचप्रमाणे पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांचे मार्फत स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) ची अंमलबजावणी करण्यात येते. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत शौचालयासाठी रक्कम रू. १२,०००/- प्रोत्साहनपर अनुदान देय आहे.

**महा आवास अभियान-ग्रामीण २०२१-२२** मध्ये विविध शासकीय योजनांशी कृती संगम करून लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत आहे. यामध्ये स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) मधून घरकुल लाभार्थ्यांना शौचालयाचा लाभ देण्यात येतो. राज्यात विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत मोठ्या प्रमाणात घरकुलांची निर्मिती करण्यात येत असून काही लाभार्थ्यांनी घरकुल बांधकाम शौचालयासह न केल्याने त्यांना शेवटचा हप्ता वितरीत करता येत नाही. त्यामुळे केंद्र शासनाच्या संकेत स्थळावर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण असूनही आर्थिक दृष्ट्या पूर्ण दिसून येत नाही. तसेच घरकुलांचे शौचालयासह बांधकाम करूनही काही लाभार्थ्यांना शौचालयाचे प्रोत्साहनपर अनुदान रक्कम रू. १२,०००/- मिळाले नसल्याचेही डॉ. राजाराम दिघे यांनी श्री. रणधीर सोमवंशी यांना सांगितले.

त्याकरीता राज्यात विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली परंतु शौचालय बांधकाम न केल्यामुळे शेवटचा हप्ता वितरीत न केलेली व यापुढे भौतिकदृष्ट्या पूर्ण होणाऱ्या सर्व घरकुल लाभार्थ्यांची यादी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) यांना दरमहा उपलब्ध करून देवून सदर लाभार्थ्यांना स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत तात्काळ शौचालयाचा लाभ देण्यात येईल. त्याचप्रमाणे स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) मधून सर्व घरकुल लाभार्थ्यांना प्राधान्याने शौचालयाचा लाभ दिला जाईल व एकही लाभार्थी शौचालया पासून वंचित राहणार नाही असे आश्वासन श्री. रणधीर सोमवंशी यांनी डॉ. राजाराम दिघे यांना दिले.



## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभमुहूर्तावर पंचायत समिती मानवत मार्फत घरकुल लाभार्थ्यांना प्रथम हप्त्याचे वितरण व भूमिपूजन कार्यक्रम

दिनांक १९ फेब्रुवारी, २०२२ रोजी महा आवास अभियान-ग्रामीण २.० अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभमुहूर्तावर पंचायत समिती मानवत मार्फत ग्रामपंचायत मंगरुळ व रामेटाकळी येथील १५१ घरकुल लाभार्थ्यांना परभणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शिवानंद टाकसाळे यांचे शुभहस्ते व प्रकल्प संचालक श्रीमती रश्मी खांडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत FTO द्वारे प्रथम हप्त्याचे वितरण व भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन पंचायत समिती मानवत अंतर्गत ग्रामपंचायत मंगरूळ व रामेटाकळी येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. ओमप्रकाश यादव, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.स्वप्नील पवार, पंचायत समितीचे सभापती, उपसभापती, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे शाखा अभियंता, विस्तार अधिकारी,



जिल्हा प्रोग्रामर तसेच पंचायत समितीस्तरावरील विस्तार अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामसेवक, सरपंच, लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी महा आवास अभियान ग्रामीण अंतर्गत आवास प्लस प्राधान्यक्रम यादीतील एकूण १५१ लाभार्थींचा प्रथम हप्ता वितरणाचा व भूमिपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. लाभार्थ्यांनी ३१ मार्चपूर्वी घरकुल बांधकाम पूर्ण करणे व त्याकरीता घरकुल मार्ट मधून एकत्रित बांधकाम साहित्य उपलब्धतेबाबतचे नियोजन करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शिवानंद टाकसाळे यांनी सर्व यंत्रणेला केल्या.

## ब्रम्हपुरी मध्ये पंचायत समिती व तहसिल कार्यालयाच्या समन्वयातून सॅण्ड बँक

महा आवास अभियान-ग्रामीण २.० अंतर्गत पंचायत समिती ब्रम्हपुरी व तहसील कार्यालय ब्रम्हपुरी यांचे समनव्याने ब्रम्हपुरी तालुक्यात जप्त केलेल्या ४० ब्रॉस वाळू उपलब्धतेतून ब्रम्हपुरी येथे सॅण्ड बँक ची निर्मिती करण्यात आली. या वाळूचे वाटप घरकुल लाभार्थ्यांना करण्याचे नियोजित आहे.

या सॅण्ड बँक मार्फत वाळू वितरणाकरीता पंचायत समिती कार्यालया मार्फत ११ गरजू पात्र घरकुल लाभार्थ्यांची निवड करून या लाभार्थ्यांची यादी तहसिल कार्यालयाकडे वाळू वाटप आदेशा करीता पाठविण्यात आली. वाळू वाटप आदेश प्राप्त झाल्यानंतर पंचायत समिती मार्फत दिनांक २६ मार्च, २०२२ रोजी पात्र घरकुल लाभार्थ्यांना वाळूचे वाटप करण्यात आले. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत श्री.सुदाम नात्थू बारई, ग्रामपंचायत मरारमेंढा यांना गट विकास अधिकारी श्रीमती प्राजक्ता भस्मे यांचे हस्ते आदेशाची प्रत देऊन वाळू वितरीत करण्यात आली. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, रमाई आवास योजना व शबरी आवास योजने अंतर्गत ग्रामपंचायत बोडखा, तुमगाव, राळेगाव, टेमुर्डा, मारा व येन्सज येथील १० लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरिता एकूण ३३ ब्रास वाळूचे वाटप सॅण्ड बँक व्दारे पंचायत समिती ब्रम्हपुरी व तहसील कार्यालय ब्रम्हपुरी यांचे समन्वयाने करण्यात आले.



## प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी लोक अदालत एक प्रभावी माध्यम

महा आवास अभियान-ग्रामीण २.० अंतर्गत लोक अदालत या उपक्रमाच्या अंमलबजावणीमुळे मोठ्या प्रमाणात प्रलंबित घरकुले पूर्ण होत आहे. यामध्ये पंचायत समिती बाभूळगाव यांच्याकडून दिनांक १२ मार्च, २०२२ रोजी लोक अदालतच्या माध्यमातून प्रलंबित घरकुले असणाऱ्या १०७ घरकुल लाभार्थ्यांना नोटीसा बजावण्यात आल्या. तालुका विधी सेवा समिती बाभूळगाव येथे लोक अदालती मध्ये घरकुल प्रकरणाची तडजोड व ग्रामपंचायती वसुलीबाबत कार्यवाही करण्यात आली.

दिनांक १२ मार्च, २०२२ रोजी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई, शिरूर, आष्टी या तालुक्यांमध्ये लोक अदालत घेऊन घरकुल त्वरित पूर्ण करणेबाबत न्यायालयामार्फत लाभार्थ्यांना आदेश देण्यात आले. त्याचप्रमाणे पंचायत समिती वडवणी येथे लोक अदालतीमार्फत लाभार्थ्यांची सुनावणी घेण्यात आली. चौथी राष्ट्रीय लोक अदालत न्यायालय दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व दंडाधिकारी प्रथम श्रेणी पंचायत समिती देगलुर येथे पहिला, दुसरा, तीसरा हप्ता घेऊन घरकुल पूर्ण न केलेल्या लाभार्थ्यांना नोटीस देऊन न्यायालयात सुनावणी घेण्यात आली. त्याचप्रमाणे तासगाव न्यायालय येथील लोक अदालत मध्ये पाहिला, दुसरा हफ्ता घेऊन घरकुल बांधकाम पूर्ण करत नसलेल्या १० लाभार्थ्यांना रू. २,१०,०००/- रकमेची तडजोड झाली. तसेच १२ लाभार्थ्यांनी लोक अदालत मध्ये बांधकाम सुरु करत असलेबाबत लेखी दिले.



## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आता १०० टक्के राज्य योजना म्हणून राबविणार

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना यांच्यासह पंडित दिनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमण नियमानुकुल करण्याची योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, पंडित दीनदयाल उपाध्याय कौशल्य योजना तसेच रूरबन या योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. ही कामे यापुढेही अशीच सुरू असावी याकरिता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आता १०० टक्के राज्य योजना म्हणून राबविण्यास येणार असल्याचे मा. मंत्री, ग्रामविकास, श्री.हसन मुश्रीफ यांनी दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर सांगितले. ग्रामविकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा निर्णय घेतल्याबद्दल मा. मंत्री, श्री. मुश्रीफ यांनी मा. मुख्यमंत्री, श्री. उद्धव ठाकरे आणि मा. उप मुख्यमंत्री, श्री. अजित पवार यांचे अभिनंदन केले.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमधील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन व भत्त्यासाठी केंद्र व राज्याचे ६०:४० असे अनुदान देण्यात येत होते. परंतु केंद्र शासनाने दि. १ एप्रिल २०२२ पासून जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रशासन निधीतील केंद्राचा ६० टक्के वाटा देणे बंद केल्याने सदर योजना १०० टक्के राज्य पुरस्कृत योजना म्हणून राबविण्यास मंजुरी देण्यात असल्याचे मा.मंत्री, श्री. मुश्रीफ यांनी यावेळी सांगितले.

केंद्राने आपला वाटा देणे बंद केले असल्याने आता प्रत्येक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेस १५ पदांच्या आकृतीबंधात कपात केली असून आता ८ पदांचा आकृतीबंध निश्चित केला आहे. यामध्ये प्रकल्प संचालक, सहायक प्रकल्प संचालक, सहायक लेखाधिकारी, कार्यालय अधिक्षक, कनिष्ठ अभियंता किंवा शाखा अभियंता, विस्तार अधिकारी, वरिष्ठ सहायक आणि लिपिक टंकलेखक (कनिष्ठ सहाय्यक) ही पदे असतील, अशी माहितीही मा. मंत्री, ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ यांनी दिली.

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा १०० टक्के राज्य योजना म्हणून राबविण्यास मान्यता**

**- मा. मंत्री ग्रामविकास, श्री. हसन मुश्रीफ**



## जिल्हास्तरीय डेमो हाऊस बांधकामाबाबत मार्गदर्शक सूचना

महा आवास अभियानाच्या पहिल्या टप्प्यामध्ये संपूर्ण राज्यात तालुकानिहाय डेमो हाऊसचे बांधकाम पंचायत समिती आवारामधे करण्यात आले आहे. तालुकास्तरीय डेमो हाऊसेस हे पारंपारिक पद्धतीने बांधण्यात आल्यामुळे त्यातून लाभार्थ्यांना नाविन्यपूर्ण, अपारंपारिक, नवनवीन तंत्रज्ञान इत्यादीबाबत मार्गदर्शन मिळण्यास मर्यादा येत आहेत. याचाच पुढील भाग म्हणून महा आवास अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये जिल्हास्तरीय डेमो हाऊस निर्मिती बाबत महा आवास त्रैमासिकाच्या माहे ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१ च्या अकांत माहिती देण्यात आली होती.

महा आवास अभियान २.० अंतर्गत संपूर्ण राज्यात प्रति जिल्हा एक याप्रमाणे एकूण ३४ डेमो हाऊसचे डिझाईन करणे व डेमो हाऊसकरिता जागा निश्चिती करून जिल्हा डेमो हाऊसचा प्रस्ताव तयार करावा. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांची नेमणूक प्रकल्प अंमलबजावणी संस्था (Project Implementing Agency) म्हणून करण्यात आलेली असल्याने प्रशासकीय व तांत्रिक मान्यता जिल्हास्तरावरूनच देता येईल. तथापि प्रस्तावित जिल्हा डेमो हाऊसचा प्रस्ताव राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयास फक्त अवलोकनार्थ सादर करण्यात यावा, जेणेकरून प्रस्तावित जिल्हा डेमो हाऊसमध्ये नाविन्यपूर्ण, अपारंपारिक, नवनवीन तंत्रज्ञान या बाबींचा समावेश असल्याची खात्री होईल.

राज्यात महा आवास अभियान २.० अंतर्गत जिल्हा डेमो हाऊस पूर्ण करावयाची आहेत. त्यानुषंगाने जा.क्र./रा.व्य.क.ग्रा.गृ./बांध/२००४/२०२२, दिनांक २८ जानेवारी २०२२ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. या मार्गदर्शक सुचनांच्या आधारे जिल्हास्तरावरील डेमो हाऊस पूर्ण करण्याची कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

# प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण सन २०१६-१७ ते २०२०-२१
## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | ९३३४ | ६८४७ | ६३२९ | ९२.४ | १ | १८३ |
| २ | पालघर | ३३९७१ | २६४३८ | २४१७१ | ९१.४ | २ | १९२ |
| ३ | सिंधुदुर्ग | ४४६३ | ३९५५ | ३३७४ | ८५.३ | ४ | २०१ |
| ४ | रत्नागिरी | ८१०४ | ६६४२ | ५५५३ | ८३.६ | ५ | ११७ |
| ५ | रायगड | ९४८४ | ९४०९ | ७१९६ | ७६.५ | ९ | २३१ |
| कोकण विभाग | | ६५३५६ | ५३२९१ | ४६६२३ | ८७.५ | १ | |
| ६ | गोंदिया | ९२६३५ | ८५४५५ | ७३३७३ | ८५.९ | ३ | २१२ |
| ७ | नागपूर | ४११०० | ३३२८२ | २४६९५ | ७४.२ | १३ | ५१२ |
| ८ | वर्धा | १९९०६ | १५०८५ | १११९२ | ७४.२ | १४ | ४२० |
| ९ | चंद्रपूर | ४१६५८ | ३४२५५ | २३३६० | ६८.२ | २३ | ३७० |
| १० | भंडारा | ६२२८१ | ५४९११ | ३६७१५ | ६६.९ | २७ | ४३३ |
| ११ | गडचिरोली | २९६०३ | २७११७ | १६८८७ | ६२.३ | ३१ | ३७९ |
| नागपूर विभाग | | २८७१८३ | २५०१०५ | १८६२२२ | ७४.५ | २ | |
| १२ | नंदुरबार | ११७८०३ | १०२३३६ | ७८४३० | ७६.६ | ६ | ३६५ |
| १३ | धुळे | ६२०५५ | ५२१३७ | ३९९४४ | ७६.६ | ७ | २५७ |
| १४ | नाशिक | ८८४५५ | ८१५६० | ६०७०८ | ७४.४ | ११ | २१४ |
| १५ | अहमदनगर | ६१०८७ | ४७६४० | ३४४८६ | ७२.४ | १५ | ४५५ |
| १६ | जळगाव | ७८८२४ | ६३११३ | ४२२०१ | ६६.९ | २६ | ४९० |
| नाशिक विभाग | | ४०८२२४ | ३४६७८६ | २५५७६९ | ७३.८ | ३ | |
| १७ | बुलढाणा | ४०६२३ | २४९७८ | १८८०४ | ७५.३ | १० | ४१३ |
| १८ | अकोला | ५०१०७ | ४०४२९ | ३००२३ | ७४.३ | १२ | ४६५ |
| १९ | अमरावती | ९९०२८ | ७६२५७ | ५४५४९ | ७१.५ | १७ | ५१५ |
| २० | यवतमाळ | ६१५२३ | ४४१२२ | २७९३८ | ६३.३ | ३० | ३२४ |
| २१ | वाशिम | १९१०८ | ११९५४ | ६६४७ | ५९.६ | ३४ | ४५४ |
| अमरावती विभाग | | २७०३८९ | १९६९४० | १३७९६१ | ७०.१ | ४ | |
| २२ | सोलापूर | ५१६१२ | ३७८५० | २७१७४ | ७१.८ | १६ | ४३७ |
| २३ | पुणे | २२२१५ | १६११७ | १११८८ | ६९.४ | २२ | ४८० |
| २४ | सातारा | १५८२८ | १२४९८ | ८४०६ | ६७.३ | २४ | ४७४ |
| २५ | कोल्हापूर | १७८५२ | १६०२२ | १०७४० | ६७.० | २५ | २७८ |
| २६ | सांगली | २२६६९ | १८२१० | ११५८९ | ६३.६ | २९ | ५१७ |
| पुणे विभाग | | १३०१७६ | १००६९७ | ६९०९७ | ६८.६ | ५ | |
| २७ | लातूर | १८४७७ | ९९५९ | ७६१९ | ७६.५ | ८ | ४०३ |
| २८ | जालना | २२८२४ | १२६५१ | ९०३० | ७१.४ | १८ | ४५९ |
| २९ | हिंगोली | १६७२७ | ११७३४ | ८३१३ | ७०.८ | १९ | २७१ |
| ३० | परभणी | १४१६९ | ७९०५ | ५५८८ | ७०.७ | २० | १७० |
| ३१ | बीड | ३०९३५ | १९१०८ | १३३५३ | ६९.९ | २१ | ३९० |
| ३२ | उस्मानाबाद | ११६९३ | ६४९१ | ४२४५ | ६५.४ | २८ | २६५ |
| ३३ | औरंगाबाद | ३४४९८ | २७३९१ | १६८२८ | ६१.४ | ३२ | ३१४ |
| ३४ | नांदेड | ६६४०३ | ४६९९५ | २८४७७ | ६०.६ | ३३ | ५०७ |
| औरंगाबाद विभाग | | २१५७२६ | १४२२३४ | ९३४५३ | ६५.७ | ६ | |
| एकूण | | १३७७०५४ | १०९००५३ | ७८९१२५ | ७२.४ | | |

# रमाई आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०
# संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | २०३१ | १७७४ | १६१९ | ९१.३ | १ |
| २ | रत्नागिरी | ६६८४ | ५८६० | ५२११ | ८८.९ | २ |
| ३ | ठाणे | १२५६ | १०१७ | ८६१ | ८४.७ | ५ |
| ४ | पालघर | ४९८ | ३९५ | ३३२ | ८४.१ | ८ |
| ५ | रायगड | २०३९ | १९६३ | १४६६ | ७४.७ | १९ |
| कोकण विभाग | | १२५०८ | ११००९ | ९४८९ | ८६.२ | १ |
| ६ | धुळे | ८५४९ | ५५३८ | ४५४५ | ८२.१ | १० |
| ७ | अहमदनगर | २८४३४ | २४९०० | २००९१ | ८०.७ | १२ |
| ८ | नाशिक | १२३३८ | ९१५३ | ७१९२ | ७८.६ | १४ |
| ९ | जळगाव | १६७५८ | १२५३३ | ९४१५ | ७५.१ | १८ |
| १० | नंदुरबार | ३५२२ | २५७० | १७३१ | ६७.४ | २६ |
| नाशिक विभाग | | ६९६०१ | ५४६९४ | ४२९७४ | ७८.६ | २ |
| ११ | सोलापूर | १७६८९ | १४४९९ | १२२८९ | ८४.८ | ४ |
| १२ | सातारा | १०३२८ | १०२२५ | ७९९६ | ७८.२ | १५ |
| १३ | कोल्हापूर | १२४४३ | १२३५९ | ९३५४ | ७५.७ | १७ |
| १४ | सांगली | ८६१४ | ७९९३ | ५४९३ | ६८.७ | २४ |
| १५ | पुणे | ९५१७ | ८८९८ | ६००८ | ६७.५ | २५ |
| पुणे विभाग | | ५८५९१ | ५३९७४ | ४११४० | ७६.२ | ३ |
| १६ | नागपूर | ८०३९ | ७०३९ | ६०८२ | ८६.४ | ३ |
| १७ | गोंदिया | १०१२७ | ७८१४ | ६५८५ | ८४.३ | ६ |
| १८ | वर्धा | ७५०९ | ५६३२ | ४७४३ | ८४.२ | ७ |
| १९ | भंडारा | १२४८० | १०६५६ | ८१०९ | ७६.१ | १६ |
| २० | गडचिरोली | ६८८० | ५७८७ | ४२८६ | ७४.१ | २१ |
| २१ | चंद्रपूर | २२८७३ | १६८२२ | १०२८३ | ६१.१ | ३० |
| नागपूर विभाग | | ६७९०८ | ५३७५० | ४००८८ | ७४.६ | ४ |
| २२ | अमरावती | १४९३७ | १०२४० | ८२३२ | ८०.४ | १३ |
| २३ | यवतमाळ | १४३४१ | १२३४५ | ९११६ | ७४.५ | २० |
| २४ | अकोला | १८०९२ | १२२३२ | ८७६२ | ७१.६ | २२ |
| २५ | वाशिम | ९१६६ | ७१६६ | ४६९५ | ६५.५ | २८ |
| २६ | बुलढाणा | १८५५४ | १३४९३ | ८६९५ | ६४.४ | २९ |
| अमरावती विभाग | | ७५०९० | ५५४७६ | ३९५८० | ७१.३ | ५ |
| २७ | परभणी | १६८४१ | १३८१६ | ११३६८ | ८२.३ | ९ |
| २८ | हिंगोली | ९९२८ | ६५४१ | ५३१६ | ८१.३ | ११ |
| २९ | लातूर | २६२४२ | १९१९६ | १३६२३ | ७१.० | २३ |
| ३० | औरंगाबाद | २२२३३ | १५२३८ | १००२१ | ६५.८ | २७ |
| ३१ | बीड | २५७३५ | १५०३१ | ९१८२ | ६१.१ | ३१ |
| ३२ | जालना | १९२४६ | ८८२५ | ४९८५ | ५६.५ | ३२ |
| ३३ | नांदेड | २१३०० | १४७६३ | ८०३१ | ५४.४ | ३३ |
| ३४ | उस्मानाबाद | २३६६४ | १४४४८ | ६८०५ | ४७.१ | ३४ |
| औरंगाबाद विभाग | | १६५१८९ | १०७८५८ | ६९३३१ | ६४.३ | ६ |
| एकूण | | ४४८८८७ | ३३६७६१ | २४२६०२ | ७२.० | |

# शबरी आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०
## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिंगोली | ३४३२ | २९५८ | २६८४ | ९०.७ | ३ |
| २ | लातूर | ६९० | ४४१ | ३७७ | ८५.५ | ६ |
| ३ | जालना | ५६४ | ४४३ | ३७४ | ८४.४ | ८ |
| ४ | नांदेड | १४९१ | १०४५ | ७९३ | ७५.९ | १५ |
| ५ | औरंगाबाद | २५३९ | २२८६ | १७२६ | ७५.५ | १८ |
| ६ | उस्मानाबाद | २९३ | १८२ | १३५ | ७४.२ | २० |
| ७ | बीड | ६५८ | ४१७ | २९१ | ६९.८ | २७ |
| ८ | परभणी | ७५२ | ७३५ | ४८० | ६५.३ | ३१ |
| औरंगाबाद विभाग | | १०४१९ | ८५०७ | ६८६० | ८०.६ | १ |
| ९ | कोल्हापूर | ३० | १३ | १३ | १००.० | १ |
| १० | सातारा | १६७ | १२१ | १०४ | ८६.० | ५ |
| ११ | सोलापूर | ६८५ | ६२० | ५२९ | ८५.३ | ७ |
| १२ | सांगली | ६० | ४९ | ४१ | ८३.७ | ९ |
| १३ | पुणे | २६७२ | २६४६ | १९२७ | ७२.८ | २१ |
| पुणे विभाग | | ३६१४ | ३४४९ | २६१४ | ७५.८ | २ |
| १४ | अहमदनगर | ३८४६ | ३८३९ | २९४९ | ७६.८ | १४ |
| १५ | जळगाव | ५२८९ | ५१४३ | ३८९५ | ७५.७ | १६ |
| १६ | नाशिक | १०९४० | १०५८४ | ७९९४ | ७५.५ | १७ |
| १७ | धुळे | ७८६० | ७६५३ | ५७४९ | ७५.१ | १९ |
| १८ | नंदुरबार | १०८५२ | ९३७९ | ६३३७ | ६७.६ | ३० |
| नाशिक विभाग | | ३८७८७ | ३६५९८ | २६९२४ | ७३.६ | ३ |
| १९ | सिंधुदुर्ग | २३ | २३ | २२ | ९५.७ | २ |
| २० | ठाणे | १८८२ | १८५५ | १५९५ | ८६.० | ४ |
| २१ | रत्नागिरी | २३८ | २२३ | १६२ | ७२.६ | २३ |
| २२ | पालघर | ७१२५ | ६९२० | ४८६७ | ७०.३ | २६ |
| २३ | रायगड | १७७० | १७६७ | १२२३ | ६९.२ | २८ |
| कोकण विभाग | | ११०३८ | १०७८८ | ७८६९ | ७२.९ | ४ |
| २४ | अमरावती | ४३५९ | ३६५६ | २९२२ | ७९.९ | १० |
| २५ | अकोला | १६८२ | ११०४ | ७८९ | ७१.५ | २४ |
| २६ | बुलढाणा | ११३६ | १०७९ | ७६२ | ७०.६ | २५ |
| २७ | यवतमाळ | ५५७२ | ५४२४ | ३७०१ | ६८.२ | २९ |
| २८ | वाशिम | ८०१ | ५६० | ३५३ | ६३.० | ३२ |
| अमरावती विभाग | | १३५५० | ११८२३ | ८५२७ | ७२.१ | ५ |
| २९ | वर्धा | २८०२ | २७२० | २१६८ | ७९.७ | ११ |
| ३० | नागपूर | २६१८ | २४६४ | १९४० | ७८.७ | १२ |
| ३१ | चंद्रपूर | ६०१६ | ५०५६ | ३९१० | ७७.३ | १३ |
| ३२ | गोंदिया | २५९९ | २१३८ | १५५६ | ७२.८ | २२ |
| ३३ | गडचिरोली | ५७३५ | ४४८२ | २६२३ | ५८.५ | ३३ |
| ३४ | भंडारा | ४६६१ | ४३६४ | २५०१ | ५७.३ | ३४ |
| नागपूर विभाग | | २४४३१ | २१२२४ | १४६९८ | ६९.३ | ६ |
| एकूण | | १०१८३९ | ९२३८९ | ६७४९२ | ७३.१ | |

# पारधी आवास योजना सन २०१६-१७ ते २०१८-१९
## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००.० | २ |
| २ | सोलापूर | २३१ | २०२ | १९० | ९४.१ | ८ |
| ३ | सांगली | ३८ | २४ | २१ | ८७.५ | १३ |
| ४ | सातारा | २४ | २१ | १८ | ८५.७ | १६ |
| ५ | पुणे | १८८ | १५९ | ११३ | ७१.१ | २१ |
| पुणे विभाग | | ४८८ | ४१३ | ३४९ | ८४.५ | १ |
| ६ | चंद्रपूर | ३५ | १९ | १७ | ८९.५ | १० |
| ७ | वर्धा | ५० | ५० | ४३ | ८६.० | १५ |
| ८ | नागपूर | ४८ | ४६ | ३६ | ७८.३ | १८ |
| नागपूर विभाग | | १३३ | ११५ | ९६ | ८३.५ | २ |
| ९ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००.० | १ |
| १० | लातूर | १७ | १३ | १३ | १००.० | ३ |
| ११ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००.० | ४ |
| १२ | परभणी | ५६ | ५६ | ५४ | ९६.४ | ६ |
| १३ | बीड | ९२ | ८६ | ७६ | ८८.४ | १२ |
| १४ | उस्मानाबाद | २४७ | २४७ | १९२ | ७७.७ | १९ |
| १५ | औरंगाबाद | ५७ | ५० | ३६ | ७२.० | २० |
| १६ | जालना | ३८ | ३२ | १९ | ५९.४ | २५ |
| औरंगाबाद विभाग | | ५९२ | ५६१ | ४६७ | ८३.२ | ३ |
| १७ | वाशिम | ६४ | ६४ | ६२ | ९६.९ | ५ |
| १८ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३३९ | ९१.४ | ९ |
| १९ | अमरावती | ४५१ | ४४४ | ३९४ | ८८.७ | ११ |
| २० | अकोला | ३७४ | ३७३ | ३२१ | ८६.१ | १४ |
| २१ | यवतमाळ | ५९४ | ५९१ | ३९४ | ६६.७ | २२ |
| अमरावती विभाग | | १८५४ | १८४३ | १५१० | ८१.९ | ४ |
| २२ | धुळे | ४३२ | ४३१ | ४०७ | ९४.४ | ७ |
| २३ | अहमदनगर | १९८ | १९८ | १६९ | ८५.४ | १७ |
| २४ | जळगाव | ५७० | ५१६ | ३२६ | ६३.२ | २३ |
| २५ | नाशिक | १४३ | १०४ | ६२ | ५९.६ | २४ |
| २६ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.० | २९ |
| नाशिक विभाग | | १३५३ | १२४९ | ९६४ | ७७.२ | ५ |
| एकूण | | ४४२० | ४१८१ | ३३८६ | ८०.९८५ | |

## आदिम आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०
## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ६८ | १२ | १२ | १००.० | १ |
| नाशिक विभाग | | ६८ | १२ | १२ | १००.० | १ |
| २ | सिंधुदुर्ग | ६१ | ४९ | ४८ | ९८.० | २ |
| ३ | रायगड | १२२६ | ९१५ | ८८० | ९६.२ | ३ |
| ४ | ठाणे | १४३३ | ११३० | ८११ | ७१.८ | ६ |
| ५ | पालघर | ९४८ | ७२४ | ४८२ | ६६.६ | ८ |
| ६ | रत्नागिरी | ५ | ५ | ० | ०.० | ३० |
| कोकण विभाग | | ३६७३ | २८२३ | २२२१ | ७८.७ | २ |
| ७ | यवतमाळ | ३६४६ | १५५२ | १०९४ | ७०.५ | ७ |
| अमरावती विभाग | | ३६४६ | १५५२ | १०९४ | ७०.५ | ३ |
| ८ | वर्धा | ३४४ | २६ | २५ | ९६.२ | ४ |
| ९ | गडचिरोली | १७०८ | १५४८ | ११२४ | ७२.६ | ५ |
| १० | चंद्रपूर | ६९३ | ३८३ | २२५ | ५८.७ | ९ |
| नागपूर विभाग | | २७४५ | १९५७ | १३७४ | ७०.२ | ४ |
| ११ | नांदेड | ४१९ | १८१ | ८७ | ४८.१ | १० |
| औरंगाबाद विभाग | | ४१९ | १८१ | ८७ | ४८.१ | ५ |
| १२ | पुणे | ५५ | ० | ० | ०.० | २९ |
| पुणे विभाग | | ५५ | ० | ० | ०.० | ६ |
| एकूण | | १०६०६ | ६५२५ | ४७८८ | ७३.४ | |

## यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना
## संचित प्रगती अहवाल - ३१ मार्च २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | २० | २० | २० | १००.० | १ |
| नागपूर विभाग | | २० | २० | २० | १००.० | १ |
| २ | सोलापूर | ४ | ४ | २ | ५०.० | ३ |
| पुणे विभाग | | ४ | ४ | २ | ५०.० | २ |
| ३ | लातूर | १० | १० | ७ | ७०.० | २ |
| ४ | उस्मानाबाद | ३६७ | ३१६ | १४९ | ४७.२ | ४ |
| औरंगाबाद विभाग | | ३७७ | ३२६ | १५६ | ४७.९ | ३ |
| ५ | अमरावती | ४५ | ४५ | १५ | ३३.३ | ५ |
| ६ | यवतमाळ | १४० | १२९ | २० | १५.५ | ६ |
| अमरावती विभाग | | १८५ | १७४ | ३५ | २०.१ | ४ |
| ७ | अहमदनगर | २० | ० | ० | ०.० | ७ |
| नाशिक विभाग | | २० | ० | ० | ०.० | 5 |
| एकूण | | ६०६ | ५२४ | २१३ | ४०.६ | |

# महा आवास अभियानामुळे पक्क्या घरासह गौरवही

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यामधील ग्रामपंचायत कार्यालय मुंडीपार येथे मंजूर घरकुल लाभार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या लाभार्थी मेळाव्याला पंचक्रोशीतील विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे घरकुल लाभार्थी उपस्थित होते. या लाभार्थी मेळाव्याला पवनी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. तुलशीराम लांजेवार, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. अक्षय तलमले, मुंडीपार ग्रामपंचायतीचे सरपंच श्रीमती सीमा राजेश पडोले, ग्रामसेवक श्री. एम. डी. पधरे, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यशाळेमध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना व घरकुल बांधकामासाठी पात्र लाभार्थ्यांना देय अर्थसहाय्य याविषयी पवनी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. तुलशीराम लांजेवार यांनी लाभार्थ्यांना व ग्रामस्थांना सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेला भोजापुर गावच्या घरकुल लाभार्थी श्रीमती पुष्पा विठ्ठल शेलमारे सुध्दा उपस्थित होत्या. भोजापुर हे गाव पवनी तालुका मुख्यालयापासून सुमारे १८ कि.मी. अंतरावर असून या गावची लोकसंख्या ११६८ आहे. श्रीमती पुष्पा विठ्ठल शेलमारे त्यांच्या कुटुंबातील ०३ सदस्यांसह या गावात वास्तवास आहे. तशी श्रीमती शेलमारे यांची घरची परिस्थिती अत्यंत हलाकीची त्यामध्ये मातीचे अत्यंत जिर्ण व मोडकळीस आलेले घर हा त्यांचा चिंतेचा विषय होता. अशातच त्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये घरकुल मंजूर झाल्याचे त्यांना मुंडीपार येथील लाभार्थी मेळ्याव्यात कळले. त्यासोबतच त्यांना घरकुल बांधकामा विषयी संपूर्ण मार्गदर्शनही मिळाले.

घरकुल मंजूर झाल्यानंतर लगेच ग्रामीण गृहनिर्माण अभियता यांनी श्रीमती पुष्पा शेलमारे यांच्या घरी भेट देवून महा आवास अभियान अंतर्गत शौचालयसह घरकुल बांधकाम हे १०० दिवसाच्या आत पुर्ण करणे उद्दीष्ट असल्याचे सांगितले. ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी त्याच गतीने कामाला सुरूवात करत घराचे ले-आऊट देवून तात्काळ घरकुल बांधकामास सुरूवात केली. पहिल्या हप्त्याचे देयक रूपये २०,०००/- मध्ये श्रीमती पुष्पा शेलमारे यांनी खोदकामासह घराचे जोता लेवल पर्यत बांधकाम केले. याकामी त्यांना ग्राम रोजगार सेवक यांच्या मार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून २५ मनुष्य दिवसाचे देयक मिळाले.

दुसऱ्या हप्त्याचे देयक रूपये ४५,०००/- प्राप्त होताच श्रीमती शेलार यांनी स्लॅब लेवल व तीसरा हप्ता रूपये ४५,०००/- मिळताच त्यांनी घरकुलाचे शौचालयासह बांधकाम पूर्ण केले. यासोबतच त्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने १० व २८ असे एकुण ३८ दिवासाचा रोजगार मिळाला. श्रीमती पुष्पा शेलार यांच्या घरकुलाचे बांधकाम पुर्ण होताच ग्रामपंचायत कर्मचारी यांनी घराची मोजनी करून गाव नमुना ८ मध्ये नोंद घेतली. श्रीमती शेलार यांनी शौचालयासह घरकुलाचे बांधकाम केल्याने त्यांना विनाविलंब शेवटच्या हप्त्याचे देयक रूपये २०,०००/- देण्यात आले.

मला महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजूर झाले होते. घरकुलाचे बांधकाम करणेकरिता ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी घरकुलाला वेळोवेळी भेट देवून मार्गदर्शन केले. ग्राम रोजगार सेवक यांच्या मार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून अकुशल देयके मिळाले. माझ्या घरकुलाची सर्वोत्कृष्ट घरकुल म्हणून महा आवास अभियान पुरस्कार २०२०-२१ करीता पंचायत समिती मार्फत निवड करण्यात आली. याकरीता ग्रामपंचायतस्तरावर प्रशस्ती पत्र देऊन मला गौरविण्यात आले. यामुळे माझे व माझ्या घरकुलाचे कौतुक सर्वत्र होते असल्याने माझे कुटुंबीय अत्यंत आनंदी व अभिमान व्यक्त करीत आहोत. माझे कच्च्या घरातून पक्क्या घरात जायचे स्वप्न महा आवास अभियानामुळे साकार झाल्याने, मी सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी व शासनाचे मनापासुन आभार व्यक्त मानते. अशी प्रतिक्रीया श्रीमती पुष्पा विठ्ठल शेलमार यांनी व्यक्त केली.





# अभियानामुळे झाले पक्क्या घराचे स्वप्न साकार

मंगळसा हे गाव वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर तालुक्यात आहे. मंगळसा ही ग्रामपंचायत असून तालुका मुख्यालयापासून अंदाजे ५ कि.मी. अंतरावर आहे. या गावची एकुण लोकसंख्या जवळपास १,०४९ इतकी असून या गावामध्ये ५३५ पुरूष व ५१४ महिलांचा समावेश आहे. यागावात साधारणतः २४६ घरांची वस्ती आहे. मंगळसा हे गाव विदर्भात मोडत असल्याने येथे प्रामुख्याने वऱ्हाडी भाषेचा वापर बोली भाषेत केला जातो. यागावातील लोकांसाठी घरकुल हा विषय अत्यंत गरजेचा झाला होता. परंतु या गावातील ग्रामस्थांचा शासकीय योजनांबाबत असा गैरसमज होता की, 'सरकारी काम १२ महिने थांब'! मात्र या ग्रामस्थांचा हा गैरसमज दूर केला महा आवास अभियान-ग्रामीण च्या माध्यमातून.

मंगळसा या गावामध्ये बहुतांश लोकांपुढे पक्क्या व सुरक्षित निवाऱ्याचा म्हणजेच घरकुलाचा मोठा प्रश्न होता. अशातच गतवर्षी राज्यात महा आवास अभियान-ग्रामीण या अभियानाची अंमलबजावणी करण्यात आली. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यात विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांची सर्व स्तरावरून प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृती करण्यात आली. यामुळे विविध गृहनिर्माण योजना ग्रामीण भागातील लोकांपर्यंत पोहचविचल्या व त्यांच्या मनातील शासकीय योजनांबद्दलचा गैरसमज दूर होवून या योजना आपल्यासाठी असल्याचे त्यांना कळले.

श्रीमती उषा दिलीप भडांगे या मंगळसा गावात गेल्या ३० वर्षापासून कुटुंबासह राहत होत्या. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. गावात राहत असलेलेल्या जागेत कुळामातीचे कच्चे घर होते. त्यामुळे पावसाळ्यात कुटुंबाला जीव मुठीत घेऊन दिवस काढावे लागत. नावाला फक्त निवारा होता, मात्र त्यांचा सर्व परिवार सदैव या घरात असुरक्षित असल्याची त्यांना पूर्ण जाणीव होती.

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत गोर, गरीब, गरजू व भूमिहीन लाभार्थ्यांना प्राधान्याने घरकुलाचा देण्याचा निर्णय शासनाने घेतला. याचाच लाभ श्रीमती उषा दिलीप भडांगे यांना झाला. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (प्रपत्र-ब) अंतर्गत श्रीमती उषा दिलीप भडांगे यांना सन २०२०-२१ मध्ये घरकुल मंजूर झाले. त्यानंतर अभियान क्षमता बांधणी कार्यशाळा, लाभार्थी मेळावे, ग्रामसभा, सर्व स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांच्या क्षेत्रीय भेटी व बैठकांच्या माध्यमातून त्यांना ग्रामीण गृहनिर्माण योजना व घरकुल बांधकामाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

श्रीमती उषा दिलीप भडांगे यांचे घरकुल मंजूर होताच पहिला हप्ता प्राप्त झाला. त्यांनी जराही विलंब न करता घरकुल बांधकामास सुरूवात केली. त्यांचे घरकुल बांधकाम सुरु असतांना पंचायत समिती स्तरावरून गट विकास अधिकारी व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी वेळोवेळी घरकुल बांधकामाला भेट देवून श्रीमती उषा दिलीप भडांगे यांना आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच पंचायत समिती स्तरावरून घरकुल बांधकामासाठीचे सर्व हप्ते टप्पानिहाय विनाविलंब वितरीत केले. त्यामुळे घरकुलाचे बांधकाम अत्यंत अल्प कालावधीत पूर्ण झाल्याने श्रीमती उषा दिलीप भडांगे कुळा मातीच्या घरातून पक्क्या घरात गेल्या.

मी गेल्या ३० वर्षांपासून कच्च्या घरात राहत होते, परंतु महा आवास अभियान-ग्रामीण व प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण या शासकीय योजनांमुळे आज पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण झाले असून माझ्या कुटुंबाला सुरक्षित निवारा मिळाला. याकरीता मी सर्व स्तरावरील शासकीय अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता तसेच गावातील सरपंच, सचिव व शासनाची आभारी असल्याचे श्रीमती उषा दिलीप भडांगे यांनी सांगितले.





# रमाई आवास योजनेमुळे मिळाला सुरक्षित निवारा

मुगट ग्रामपंचायत मुदखेड तालुक्या अंतर्गत नांदेड जिल्ह्यामध्ये आहे. श्री. उत्तम पुरभाजी हाटकर हे या ग्रामपंचायतीचे रहिवाशी असुन त्यांना रमाई आवास योजने अंतर्गत सन २०१८-१९ या वर्षात घरकुल मंजूर झाले. यापूर्वी श्री. उत्तम पुरभाजी हाटकर साध्या माती व पत्र्याच्या घरात राहत होते. मराठवाड्यात उन्हाळ्यामध्ये अत्यंत उष्णता त्यात पत्र्याचे घर म्हणजे गरम तव्याखाली बसल्यासारखे आणि पावसाळ्यामध्ये वादळीवाऱ्यासह पाऊस घराच्या छतातून पाणी गळती यासोबतच घराचे छप्पर उडण्याची मनात भिती निर्माण व्हावयाची. अशा बिकट परिस्थितीत मनी बाळगलेले पक्क्या घराचे स्वप्न या आयुष्यात पुर्ण होणार किंवा नाही याबाबत श्री. उत्तम पुरभाजी हाटकर यांच्या मनात नेहमी शंका निर्माण होत होती.

घरकुल बांधकामासाठी सर्व प्रयत्न करून झाल्यावर शेवटी ग्रामपंचायत कार्यालयाची वाट धरली आणि थेट ग्रामसेवकांकडे श्री. उत्तम पुरभाजी हाटकर यांनी चौकशी केली कि, गावामध्ये इतर लाभार्थ्यांना शासकीय घरकुल मिळत आहे त्याप्रमाणे मलाही घरकुल मिळेल का? घरकुल मिळणेसाठी शासनाचे नियम, अटी व शर्ती बाबतही चौकशी केली. श्री. उत्तम पुरभाजी हाटकर यांची घरकुलाबाबतची गरज लक्षात घेता ग्रामसेवक, श्री. राजेश्वर लक्ष्मण भुरे यांनी शासनाच्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांबाबत त्यांना सविस्तर माहिती दिली. तसेच त्यांना रमाई आवास योजना अंतर्गत आपणास घरकुल मिळेल असे सांगितले. त्यानुसार ग्रामसेवकांशी रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल बांधकामासाठी पात्र लाभार्थ्यांना देय अर्थसहाय्य व हप्ते वितरणाची पध्दती याबाबतची माहिती दिली. ग्रामसेवक, श्री. राजेश्वर लक्ष्मण भुरे यांनी श्री. उत्तम पुरभाजी हाटकर यांनी घरकुल प्रस्ताव सादर करणेकामी आवश्यक कागदपत्राची यादी देवून ही कागदपत्रे लवकरात लवकर सादर करण्यास सांगितले.

श्री. उत्तम पुरभाजी हाटकर यांनी सर्व कागदपत्रांची जुळवाजूळव करून ग्रामपंचायत कार्यालयात सादर केली. त्यानुसार ग्रामसेवकांनी घरकुल मागणी प्रस्ताव तयार करून ग्रामसभेत मंजूरी घेवून श्री. उत्तम पुरभाजी हाटकर यांना रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूरीचा ग्रामसभेचा ठराव घेतला. श्री. उत्तम पुरभाजी हाटकर यांच्या घरकुलाला मंजूरी मिळाल्यामुळे त्यांच्या पक्क्या घराच्या आशा पल्लवित झाल्या.

पंचायत समिती स्तरावर डेटा एन्ट्री ऑपरेटर, श्री. रामकृष्ण कुलकर्णी यांनी श्री. उत्तम पुरभाजी हाटकर यांना आधार कार्ड, नमुना नंबर ८, बॅक पासबुक, जॉबकार्ड इत्यादी कागदपत्राची पुर्तता करण्यासाठी सांगितले. श्री. उत्तम पुरभाजी हाटकर यांच्याकडून सदरची कागदपत्रे प्राप्त होताच गटविकास अधिकारी, पंचायत समिती मुदखेड यांच्यामार्फत घरकुल मंजूर करून पहिला हप्ता श्री. उत्तम पुरभाजी हाटकर यांच्या बॅक खात्यामध्ये अग्रीम स्वरूपात विनाविलंब वितरीत करण्यात आला. घरकुलाचा पहिला हप्ता बँक खाती जमा होताच श्री. उत्तम पुरभाजी हाटकर यांनी घरकुल बांधकामास सुरूवात केली. घरकुल बांधकाम करण्यासाठी ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी वेळोवळी मार्गदर्शन केले. तसेच जिल्हास्तरावरून कनिष्ठ अभियंता, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, प्रकल्प संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडुनही वेळोवेळी सहकार्य लाभले.

मला घरकुल बांधकामासाठी रमाई आवास योजने मधून घरकुलासह स्वच्छ भारत मिशन मधून शौचालय, मनरेगा मधून रोजगार मिळाला. तसेच प्रधानमंत्री उज्वला योजने मधून गॅस मिळाल्याने स्वयंपाक करण्यासाठी वेळ लागत नाही. यापुर्वी पावसाळयात ओली लाकड असल्यामुळे तासंन तास चुल पेटत नव्हती व डोळ्यात धुर जात होता. मात्र आता या जाचा पासून सुटका झाली आहे. माझे पक्के घरकुल पुर्ण झाल्यामुळे मी आता खुप समाधानी आहे. आता मला पावसाळ्यात वादळ वाऱ्याची भिती नाही. मला पक्के घर मिळाल्यामुळे मी अत्यंत आनंदी असून याकामी मला ज्यांनी सहकार्य केले त्यांचा सर्वाचा ऋणी असल्याचे श्री. उत्तम पुरभाजी हाटकर यांनी सांगितले.



# प्रधानमंत्री आवास योजनेमुळे मिळाले पक्के घरकुल

साळवे हे गाव धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यामध्ये आहे. साळवे गाव खांदेश (उत्तर महाराष्ट्रात स्थित असल्याने या गावामध्ये अहिराणी भाषेचा वापर बोली भाषेत केल्या जातो. साळवे ग्रामपंचायत असून तालुका मुख्यालयापासून अवघ्या ९ कि.मी. अंतरावर स्थित आहे. या गावाला धुळे, शहादा व नंदुरबार जवळची शहरे असून या गावची अंदाजे लोकसंख्या २,७२४ आहे. तसेच या गावामध्ये ५४६ घरांचा समावेश आहे.

साळवे या गावामध्ये श्रीमती अंजना गोपाल भारती त्यांच्या कुटुंबासह कच्च्या मातीच्या घरात राहत होत्या. त्या राहत असलेले घर अत्यंत लहान व जुने असल्यामुळे त्यांच्या परिवारास राहतांना व पाहुणे आल्यास जागेची अडचणी येत होती. पावसाळ्यात तर जेवढा पाऊस बाहेर पडायचा तेवढे जास्त घर गळायचे त्यामुळे अक्षरशः घरात कधी कधी डबके साचायचे यामुळे सर्व कुटुंबीय त्रस्त झाले होते. अशातच श्रीमती अंजना गोपाल भारती यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजूर झाल्याचे ग्रामपंचायत कार्यालयाकडून कळविण्यात आले. तसेच त्याकरीता आवश्यक कागदपत्र बँकेचे पासबुक, आधारकार्ड, जॉब कार्ड, मोबाईल नंबर इ. ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यसाठी ग्रामसेवक यांनी सांगितले. श्रीमती अंजना गोपाल भारती यांनी कागदपत्रांची पुर्तता करताच ग्रामसेवक यांनी त्यांच्या घरकुलाचा प्रस्ताव ग्रामसभेच्या ठरावासह पंचायत समिती, शिंदखेडा येथे मंजूरीसाठी सादर केला. घरकुलाचा प्रस्ताव सादर होताच ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी श्रीमती अंजना गोपाल भारती यांनी त्यांच्या पूर्वीच्या घराला भेट देवून जिथे घर बांधणार त्या जागेचे फोटो काढून पंचायत समिती कार्यालयास सादर केले.

पंचायत समिती स्तरावर घरकुल मंजूरीची प्रक्रीया तात्काळ पूर्ण करून श्रीमती अंजना गोपाल भारती यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०२०-२१ या वर्षात घरकुल मंजूर करण्यात आले. बँक खाते क्रमांक व घरकुल संबंधित माहिती व आवश्यक कागदपत्रांची यापूर्वीच पुर्तता केली असल्याने श्रीमती अंजना गोपाल भारती यांना अनुदानाचा पहिला हफ्ता त्वरीत वितरीत करण्यात आला. पहिला हप्ता प्राप्त होताच श्रीमती अंजना गोपाल भारती यांनी विनाविलंब घरकुल बांधकामास सुरुवात केली. बांधकाम सुरु असतांना ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, पंचायत समिती व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे अधिकारी यांनी वेळोवेळी भेटी देऊन श्रीमती अंजना गोपाल भारती यांना घरकुल बांधकामाबाबत मार्गदर्शनासह प्रोत्साहीत केले. ज्या वेगाने घरकुलाचे बांधकाम पूर्ण होत गेले त्याच वेळी बांधकामाच्या टप्प्यानुसार अनुदानाच्या रक्कमा श्रीमती अंजना गोपाल भारती यांच्या बँक खात्यावर त्वरीत जमा करण्यात आल्या. याकामी त्यांना पंचायत समितीस्तरावरून मार्गदर्शनाहस आवश्यक सर्व सहकार्य मिळाले. त्यासोबतच महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून रोजगार मिळाल्याने घरकुल बांधकामास मदत झाली. तसेच श्रीमती अंजना गोपाल भारती यांनी स्वतः जवळची काही रक्कम घरकुल बांधकामासाठी टाकुन घरामध्ये किचन ओटा, शौचालय, बाथरूम मध्ये टाइल्स, लाईट फिटिंग व इलेक्ट्रीफीकेशनचे काम पूर्ण केले.

गेल्या कित्येक वर्षापासून कच्च्या मातीच्या घरात राहणारे माझे कुटुंब आज पक्क्या व नैसर्गिक आपत्ती रोधक घरात राहत असल्याने अत्यंत आनंदी असून कित्येक वर्षापासून मनी बाळगलेले पक्क्या घराचे स्वप्न प्रधानमंत्री आवास योजनेमुळे पूर्ण झाले. याकरीता मी शासनाचे आभार मानते. अशी प्रतिक्रीया श्रीमती अंजना गोपाल भारती यांनी दिली.





# आवास योजनेमुळे कातकरी समाज मुळ प्रवाहात परत

कातकरी समाज हा सतत वेगवेगळ्या ठिकाणी भटकंती व भ्रमंती करणारा प्रवर्ग असून त्यांच्या जीवनात स्थैर्य ही कल्पनाच अस्तित्वात नाही. उदर निर्वाहासाठी मासेमारी हा त्यांचा मुख्य व्यवसाय असून याकरीता हे लोक वेगवेगळ्या ठिकाणी भटकंती करतात. कातकरी हा समाज आज सर्वसामान्यापासून अत्यंत दूर गेला आहे. या समाजाला कुठेतरी स्थैर्य मिळावे व समाजाच्या मुळ प्रवाहात आणावे, जेणे करून त्यांच्या मुलांना इतर मुलांप्रमाणे शिक्षण व आरोग्याची सर्व सुख सुविधा घेता येईल. याकरिता शासन सर्वोत्तोपरी प्रयत्न करीत असून अशा घटकांसाठी शासनाच्या विविध राबविल्या जातात. असाच एक प्रयत्न कातकरी समाजाला मुळ प्रवाहात आणण्यासाठी घरकुले बांधून देवून ग्रामपंचायत केसकरवाडी, तालुका जावली, जिल्हा सातारा येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत करण्यात आला.

कातकरी समाज सतत भटकंती करणारा अशातच त्यांना घरकुलाचा लाभ द्यावयाचा म्हणजे घरकुल बांधकामासाठी जागेची उपलब्धता करणे हा पहिला प्रश्न उदभवला. याकरीता पंचायत समितीचे गट विकास अधिकारी व तहसिलदार यांनी संयुक्तपणे ग्रामपंचायत केसकरवाडीचे सरपंच, ग्रामसेवक व लाभार्थी यांची बैठक घेवून गावामध्ये जागेची उपलब्धता केली. घरकुल मंजूरी व निधी वितरणा कामी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सातारा येथील अधिकारी/ कर्मचारी यांनी स्वतः लक्ष घालून सन २०२०-२१ मध्ये ४ लाभार्थ्यांना मंजूरी आदेश दिल्याने कातकरी समाजातील ४ लाभार्थ्यांना हक्काचा निवारा मिळणार होता.

दि.०१ जूलै, २०२१ रोजी प्रत्यक्ष कामाला सुरूवात व दि. ३० डिसेंबर, २०२१ रोजी अवघ्या ६ महिन्याच्या कालावधीत सर्व घरकुलांचे बांधकाम पुर्ण झाले. याकरीता प्रती लाभार्थी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधून रू. १,२०,०००/-, मनरेगा मधून अकुशल मजूरी रू. २२,०००/-, ग्रामीण गवंडी प्रशिक्षण मधून रू.७८,७५०/-, शोषखड्डे रू. २,८००/-, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) मधून वैयक्तिक शौचालयसाठी १२,०००/- असा एकूण रु **८,७३,०५०/-** इतका लाभ विविध शासकीय योजनेतून या लाभार्थ्यांना देण्यात आला. याकरीता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विनय गौडा, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्रीमती सुषमा देसाई, पंचायत समिती जावलीचे गट विकास अधिकारी श्री. रमेश काळे, पंचायत समिती जावलीचे विस्तार अधिकारी श्री.सुर्यकांत निकम, केसकरवाडीचे सरपंच श्री. विष्णु साळुंखे, ग्रामसेवक श्री. संतोष देशमुख गायकवाड, आखाडे पॅनल तांत्रीक अधिकरी, डेटा एन्ट्री ऑपरेटर व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले.

कातकरी समाजाच्या ४ लाभार्थ्यांना स्वतःचे हक्काचे पक्के घरकुल मिळाल्याने या सामाजाला स्थैर्य प्राप्त झाले असून कुठेतरी भटकंती थांबली आहे. या चार कुटुंबातील लोकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळणार तसेच त्यांच्या मुलांना इतरांप्रमाणे आरोग्य व शिक्षणाचा लाभ घेता येईल. शासनाच्या ग्रामीण गृहनिर्माण योजनेमुळे हा कातकरी समाज मुळ प्रवाहात परतला आहे. नविन घरांमध्ये राहायला जाताना एक वेगळाच आनंद या कातकरी समाजाच्या कुटुंबातील लोकांच्या चेहऱ्यावरती पहावयास मिळाला. चातक पक्षी ज्याप्रमाणे पावसाच्या थेंबाची वाट पहातो त्याप्रमाणे हे कातकरी जणू घराची वाट पाहत असावे, जेणे करून त्यांनाही इतर लोकांप्रमाणे हा आमचा कायमचा पत्ता असल्याचे सांगता येईल.





# घरकुलासाठी महिलेचे अथक प्रयत्न व जिद्द प्रेरणादायी

कोकण म्हटलं, की डोळ्यासमोर उभे राहतात उंच हिरवेगार डोंगर, नद्या-खाड्या आणि अथांग समुद्र! कोकणच्या या सौंदर्यात विविध घटक आणखी भर घालत असून पावसाळ्यात घाट रस्त्यातून जाताना दिसणारं कोकण म्हणजे, हिरवाईचं एक सुंदर स्वप्नच! सर्वत्र पसरलेली भातशेती कोकणच्या सौंदर्यात भर घालण्याचे काम करत असते. डोंगराच्या उतारावर टप्प्याने असणारी भातशेती कोकणात येणाऱ्या पर्यटकांच्या डोळ्यांचे पारणे फेडत असते. गढूळ पाण्याने दुधडी भरुन वाहणाऱ्या नद्या आणि श्रावण महिन्यात या हिरवाईच्या पाश्वर्भूमीवर ऊन पावसाच्या खेळात सायंकाळच्या वेळी दिसणारे इंद्रधनुष्य म्हणजे कवितेत वर्णन केल्याप्रमाणे अनुभूतीस येणारं कोकण असतं. असच सह्याद्रीच्या कुशीत वसलेल कणकवली तालुक्यातील निसर्ग सौंदर्याने नटलेल अन्न धान्यान समृध्द एक टुमदार गाव म्हणजे हरकुळ बुद्रुक. कणकवली रेल्वे स्टेशन पासुन हे गाव सुमारे १० किलोमिटर अंतरावर निसर्गाच्या सानिध्यात वसलेल आहे. या गावात विविध जाती जमातीचे लोक आनंदाने आणि सुखासमाधाने राहतात. अशाच या गावात श्रीमती शुभांगी घाडीगांवकर या आपल्या कुटुंबासमवेत वास्तव्य करतात. घरातील परिस्थिती अंत्यत हलाखिची आणि बेताची असून डोक्यावरील छत कधी उडुन जाईल ही भिती श्रीमती शुभांगी यांना सतत सतावत होती.

पण म्हणतात ना 'देव तारी त्याला कोण मारी' अशातच हरकुळ बुद्रुक ग्रामपंचायतीने श्रीमती शुभांगी घाडीगावंकर यांची अडचण लक्षात घेवून प्राधान्याने त्यांच्या घरकुलाचा प्रस्ताव पंचायत समिती कणकवली येथे सादर केला. ग्राम विकास अधिकारी श्री. संजय कवटकर यांनी त्यात मोलाचे सहकार्य केले. स्वत: जातीने या प्रकरणात लक्ष घालुन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.राजेंद्र पराडकर यांनी पंचायत समिती कणकवलीचे गट विकास अधिकारी श्री. अरुण चव्हाण, पंचायत समितीचे सभापती श्री. मनोज रावराणे, पंचायत समितीचे उपसभापती श्री. प्रकाश पारकर, अधिक्षक श्री. प्रमोद पालकर यांच्याशी चर्चा करुन श्रीमती शुभांगी घाडीगांवकर यांचा घरकुल मंजूरीचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला. जिल्हास्तरावरुन या प्रस्तावाला त्वरीत मंजूरी देवून श्रीमती शुभांगी घाडीगांवकर यांचे घरकुल मंजूर करण्यात आले. तसेच त्यांना पहिल्या हप्त्याचे वितरणही करण्यात आले. त्याचप्रमाणे ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाच्या माध्यमातून श्रीमती शुभांगी घाडीगांवकर यांचे घरकुल बांधकाम पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

श्रीमती शुभांगी घाडीगांवकर यांना घरकुल बांधकामासाठी पहिला हप्ता मिळताच घरकुल बांधकामास सुरूवात केली. परंतु संपुर्ण जगात कोरोना महामारीचे सावट अशातच लॉकडाउन असल्यामुळे घरकुल बांधकामाचे साहित्य मिळणे कठीण काम होते. साहित्य मिळाले तर ज्यादा पैसे मोजावे लागत होते, त्यात साहित्य वाहतूकीचे दर गगनाला भिडले होते. अशा कठणी परिस्थिती मध्येही श्रीमती शुभांगी घाडीगांवकर यांनी बांधकाम साहित्याची उपलब्धता केली. परंतु एवढ्यांने संपले नाही साहित्य उपलब्ध झाले तर बांधकाम करण्यासाठी मजूर मिळत नव्हते. अशा कठीण परिस्थितीही श्रीमती शुभांगी घाडीगांवकर जराही न डगमगता खंबीरपणे प्रयत्न करत होत्या. जणू या माऊलीने आपल्या लेकराना निवारा मिळावा असा प्रणच केला होता. 'प्रयत्नार्थी परमेश्वर' ही म्हण श्रीमती शुभांगी घाडीगांवकर यांनी खरी करून त्यांनी ग्रामीण गवंडी प्रशिक्षण व इतर माध्यमातून घरकुल बांधकामासाठी मजूरांची व्यवस्था करण्यात आली. अशा प्रकारे श्रीमती शुभांगी घाडीगांवकर यांनी केलेल्या प्रयत्नातून सन २०२०-२१ मध्ये घरकुल पुर्ण केले.

घरकुलासाठी श्रीमती शुभांगी घाडीगांवकर यांनी घेतलेले परिश्रम हे प्रेरणादायी असून याकरीता जागतिक महिला दिनी पंचायत समिती कणकवली येथे सभापती यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला.



# फोटो गॅलरी


















# मिडीया कवरेज

## महाआवास अंतर्गत ५ लाख घरे

**ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ यांची माहिती**

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

राज्यात महाआवास अभियानाच्या पहिल्या टप्प्यात ५ लाख घरे बांधण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. तर महाआवास अभियान २ अंतर्गत ही योजना पूर्ण करण्याचा विचार राज्य सरकार करीत आहे, अशी माहिती ग्रामविकास व कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांनी केला आहे.

महाआवास अभियानासंदर्भात मंत्रालयात गुरुवारी विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी मुश्रीफ यांनी ही माहिती दिली. या बैठकीला ग्रामविकास विभागाचे सहसचिव मंगेश मोहिते, राज्य व्यवस्थापन कक्ष (ग्रामीण गृहनिर्माण) संचालक डॉ. राजाराम दिघे, प्रधानमंत्री आवास योजनेचे उपसंचालक निलेश काळे, मंजिरी टकले यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. महाआवास अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात गुणात्मक व संख्यात्मक बदल करण्यात आला असून त्यात लँड बँक, सँड बँक, बहुमजली गृहसंकुले या बाबींचा समावेश करण्यात आला आहे. मंजुरीनंतर पहिला हप्ता वितरित करण्याचा कालावधी ३७ दिवसांवरून ७ दिवसांवर आणावा. मंजुरीनंतर घरकुले वेळेत पूर्ण करावीत. प्रधानमंत्री आवास योजनेतील उर्वरित मंजुरी प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी, भूमिहीन लाभार्थ्यांना तात्काळ जागा उपलब्ध करून द्यावी, अशा सूचनाही मुश्रीफ यांनी यावेळी केल्या. घरकुलाला अधिक गती मिळावी यासाठी केंद्रीय ग्रामविकास विभागाने 'ड' प्लस यादीला मान्यता दिली असल्याने १५ फेब्रुवारी २०२२ पर्यंत त्यास १०० टक्के घरकुलांना मंजुरी देण्यात यावी, अशी सूचनाही मुश्रीफ यांनी केली.



## महाआवास अभियानांतर्गत जिल्ह्यात ८० टक्के काम पूर्ण

–पालकमंत्री मुश्रीफ

## लाभार्थ्यांच्या वेदना जाणून घ्या : आ. पाटील

### गडहिंग्लजला घरकुल लाभार्थ्यांची कार्यशाळा; सन्मानपत्राचे वाटप

## पालकमंत्र्यांच्या हस्ते घरकुलांच्या चाव्यांचे वाटप

म. टा. वृत्तसेवा, पालघर

## महाआवास अभियांतर्गत योजनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी–ना.चव्हाण

### मुखेड व भोकर डेमो हाऊसचे ऑनलाईन उद्घाटन

नांदेड/प्रतिनिधी

## शिरपूरला तालुकास्तरीय कार्यशाळा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर :** केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई, शबरी, पारधी आवास योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच गुणात्मक प्रगती व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून राज्यात १०० दिवसांचे महाआवास अभियान ग्रामीण भागात सुरू करण्यात आले आहे. यासंदर्भात शिरपूर येथे तालुकास्तरीय कार्यशाळा घेण्यात आली.

येथील पंचायत समितीच्या हॉलमध्ये आमदार काशिराम पावरा यांच्या उपस्थितीत तालुकास्तरीय कार्यशाळा पडली. यावेळी सभापती सतारसिंग पावरा, उपसभापती धनश्री बोरसे, गटविकास अधिकारी युवराज शिंदे, सहाय्यक गटविकास अधिकारी मोरे, जिल्हा परिषद सदस्य योगेश बादल, पंचायत समिती सदस्य दिनेश पावरा आदी उपस्थित होते

१०० दिवसांचे महाआवास अभियानाअंतर्गत अपूर्ण घरकुलांचे बांधकाम पूर्ण करणे, घरकुल योजना संबंधित संलग्न विविध योजनांची माहिती देण्यात आली.

अभियान कालावधीत घरकुलासंबंधित व त्या संलग्न योजनांचा प्रचार व प्रसार लाभार्थ्यांपर्यंत करण्यात येऊन अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याच्या सूचना आमदार काशिराम पावरा यांनी यावेळी दिल्या.

तसेच ग्रामपंचायतस्तरावर देखील सरपंच व ग्रामसेवकांनी गावस्तरावरील समितीच्या माध्यमातून घरकुल लाभार्थ्यांच्या उपस्थितीत महाआवास अभियानाची कार्यशाळा घेऊन घरकुल लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात यावे, असे देखील यावेळी सूचित करण्यात आले.

महाविकास अभियान ग्रामीण भागात यशस्वी करून शिरपूर तालुका पहिल्या क्रमांकावर राहण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे गटविकास अधिकारी युवराज शिंदे यांनी सांगितले. तालुक्यातील सरपंच व ग्रामसेवक व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून कार्यशाळेत सहभागी झाले होते.



शिरपूर येथे तालुकास्तरीय कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना. आमदार काशिराम पावरा.

## एकाचदिवशी १३०० 'रमाई' घरकुले मंजूर

### ग्रामीण विकास यंत्रणेचे वेगवान काम : एका क्लिकवर प्रक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

तालुकावार मंजूर झालेली 'रमाई' घरकुले...

## बचत गटाच्या खरेदी-विक्री केंद्राचे उद्घाटन

चाकूर : खरेदी-विक्री केंद्राचे उद्घाटन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल.

राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत अंबिका महिला बचत गटाच्या माध्यमातून तालुकास्तरीय खरेदी विक्री केंद्र व उपहार गृह सुरु करण्यात आले आहे. याठिकाणी महिलांनी बनविलेल्या भाकरी, नाचणी पापड, लोणचे, चटण्या, ठेचा, झुणका भाकर हे विक्रीसाठी ठेवण्यात आले आहे. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रभू जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, गटविकास अधिकारी वैजनाथ लोखंडे, विस्तार अधिकारी एकनाथ बुआ, अनंत कसबे, लातूररोडच्या सरपंच वसुंधरा मुंडे, माजी सरपंच मधुकर मुंडे, देवकुमार कांबळे, उमेदचे महादेव शेळके, विष्णू काळे, शिवाजी दराडे, तानाजी सोळुंके आदी उपस्थित होते.

## गावाकडची घरं आता लाकडाविना बांधली जाणार

### जिल्हा परिषदेचा डेमो हाऊस : दरवाजे, सांडपाण्यासाठी शोषखड्डा

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** ग्रामीण भागातील पंतप्रधान आवास योजनेला चालना देण्यासाठी लाकूड, मातीच्या विटा न वापरता फ्लायॲश वीट व लोखंडी दरवाजाच्या वापराने फ्रेमड् स्ट्रक्चरचे डेमो हाऊस बांधण्यात येणार आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष अनिरुद्ध कांबळे यांच्या हस्ते या डेमो हाऊसचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, सहायक प्रकल्प अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, अभियंता पी. एच. कुलकर्णी उपस्थित होते. जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत गेल्या पाच वर्षांपासून घरकूल योजना राबविली जात आहे. पंतप्रधान आवास योजनेतून लाभार्थ्यास २६९ चौ. फुटाचे स्वयंपाकघर व हॉलचे पत्र्याचे घर बांधण्यासाठी १ लाख २० हजार अनुदान दिले जाते. लाभार्थी स्वत:चा हिस्सा घालून चांगली घरे बांधत आहेत. तरीही कमी खर्चात चांगले घर कसे बांधावे, याचे मॉडेल लोकांसमोर ठेवण्यासाठी डेमो हाऊसला मंजुरी मिळाली आहे.

जिल्ह्यात ५१ हजार ९१२ घरकूल मंजूर आहेत. पुणे विभागातही सर्वाधिक संख्या असल्याचे सीईओ स्वामी यांनी नमूद केले. घरकूल योजनेला गती देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्याचे यावेळी ठरविण्यात आले.



घरकूल योजनेला गती देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आवारात बांधण्यात येणाऱ्या पर्यावरणपूरक डेमो हाऊसचे भूमिपूजन करताना अनिरुद्ध कांबळे, यावेळी दिलीप स्वामी, संतोष धोत्रे आदी दिसत आहेत.

## कामगार उपायुक्तांनी केली घरकुलांची पाहणी

परभणी/प्रतिनिधी

## दोंदेत 'आवास प्लस' योजना सुरू

**कडूस : पुढारी वृत्तसेवा**

दोंदे (ता. खेड) येथेग्रामपंचायतीत प्रकल्प संचालक शालिनी कडू पाटील यांच्या हस्ते 'आवास प्लस' योजनेचा शुभारंभ झाला. पुणे जिल्ह्यात नव्याने 'आवास प्लस' योजनेअंतर्गत घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे.

दोंदे गावातील 'आवास प्लस' योजनेची २, 'शबरी घरकुल' योजनेची ३ अशी एकूण ५ घरकुले मंजूर झाली आहेत. शालिनी कडू पाटील म्हणाल्या की, पुढील आर्थिक वर्षात गावातील सर्व पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ देणार असून, लवकर घरकुलाची कामे पूर्ण करून घ्यावीत. या वेळी गावात चांगले काम करणाऱ्या चिंतामणी महिला बचत गटाला त्यांनी भेट दिली व महिलांना त्यांच्या व्यवसायवाढीसाठी मार्गदर्शन केले.



**पुणे जिल्ह्याच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू यांच्या हस्ते दोंदे गावात 'आवास प्लस' योजनेचा शुभारंभ करण्यात आला.**

या वेळी सभापती अरुण चौधरी, उपसभापती वैशालीताई गव्हाणे, गटविकास अधिकारी अजय जोशी यांच्या हस्ते घरकुल लाभार्थी सोपान सुकाळे, सुनंदा केदारी, राजाराम केदारी, धोंडिभाऊ केदारी यांना घरकुलमंजूरीचे आदेश देण्यात आले. विस्तार अधिकारी अनिता ससाणे, सुखदेव साळुंके, सरपंच चंद्रकांत बारणे, उपसरपंच सिद्धार्थ कोहिणकर, सदस्य हनुमंत कदम, नंदा जाधव, किरण तनपुरे, वैशाली सुकाळे, तृप्ती दरवडे, सुनीता बनकर, सुरेखा बारणे, ग्रामसेवक नीलेश पांडे उपस्थित होते.

## घरकुल लाभार्थ्यांच्या जागेसाठी धडपड

पुणे : पुढारी वृत्तसेवा

## महाआवास अभियानांतर्गत महिलांचा गौरव

सर्वोत्कृष्ट सहभाग असलेल्यांना दिले प्रशस्तिपत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

## 'महाआवास'मध्ये काम करणाऱ्या महिलांचा सन्मान



पालघर, (वा) महाआवास अभियानाची अंमलबजावणी राज्यभरात प्रभावीपणे सुरू आहे. या अनुषंगाने योजनेस अधिक गती देण्याच्या उद्देशाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला सक्षमीकरणासाठी महिला लाभार्थ्यांचे एकत्रित गृहप्रवेश प्रशस्तीपत्रक वाटप, कार्यक्रम जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सांबरे यांच्या उपस्थितीत पालघर पंचायत समिती सभागृहात पार पडला.

महा आवास अभियान-ग्रामीण टप्पा २ अंतर्गत मंजूरी दिलेल्या महिला लाभार्थ्यांना घरकुल मंजूरीबाबतचे प्रमाणपत्र वाटप करणे, महा आवास अभियान ग्रामीण टप्पा २ अभियानात महत्वपूर्ण योगदान दिल्याबाबत महिला अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशस्तीपत्रक वाटप, तसेच सर्वाधिक घरकुले पुर्ण केलेल्या ग्रामपंचायत मधील महिला सरपंच व महिला ग्रामसेवक यांना प्रशस्ती पत्रक वाटप तसेच सत्कार समारंभ जिल्हा विकास ग्रामीण यंत्रणा जिल्हा परिषद पालघर आणि पंचायत समिती पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती, पालघर येथे आयोजित करण्यात आला होता.

## घरकुल कसं बांधावं? पं.स.च्या आवारात तयार केला डेमो तयार



छाया : सतीश गायकवाड

बीड (रिपोर्टर) बीड जिल्ह्यामध्ये दरवर्षी शेकडो लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करून ते घरकुल त्या त्या पंचायत समितीच्या मार्फत बांधून घेतले जातात. घरकुल नेमकं कसं बांधावं याचं डेमोच बीड पंचायत समितीने आपल्या कार्यालयासमोर उभा केलं आहे.

वंचित घटकांना आपल्या हक्काचा निवारा मिळावा यासाठी घरकुल मंजूर केले जात आहे. दरवर्षी गावांना घरकुल बांधण्याचे टार्गेट दिले जाते. यंदाही बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात घरकुल बांधले जाणार आहेत. घरकुलाची रुपरेषा कशी असावी याची माहिती अनेक लाभार्थ्यांना नसते. काही जण वेगेवगळ्या पद्धतीचे घरे बांधत असतात. बीड पंचायत समितीने घरकुल कसे असावे याचा डेमो पंचायत समितीने आपल्या नवीन इमारतीच्या कार्यालयासमोर तयार केला आहे. विस्तार अधिकारी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली हा डेमो तयार करण्यात आला आहे.

## पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात घरकुलाच्या चावीचे वाटप

## नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानातून बांधावे घरकुल

### झेडपी अध्यक्ष कांबळे : महाआवास अभियान कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

## महिला दिनाचे औचित्य साधून नांदुरा पं.स.ने महिला कुटुंब प्रमुखांचा रमाई घरकुल मंजूर करून केला सन्मान

**आधारस्तंभ वृत्तसेवा**

**नांदुरा (प्रतिनिधी)-** पंचायत समितीच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून गट विकास अधिकारी समाधान वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली डाटा ऑपरेटर हरीश भुंबरे तथा गृहनिर्माण अभियंता धीरज डोसे यांनी ग्रामीण महाआवास योजना सन २०२१ - २०२२ अंतर्गत नांदुरा तालुक्यातील १३ गावातील अनुसूचित जातीच्या १३ महिला कुटुंब प्रमुख असलेल्या महिलांना रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर करून खऱ्याअर्थाने कृतीतून सन्मान केल्याबद्दल मागासवर्गीय महिला कुटुंबाचा खऱ्या अर्थाने महिला दिन सार्थक ठरला असून अशा १३ मागासवर्गीय महिलांना घरकुल देऊन त्या महिलांचे महिला दिनी घरांचे स्वप्न नांदुरा पंचायत समितीने पूर्ण केल्याचे समाधान झाले. त्या महिलांच्या चेहऱ्यावर फुलताना दिसून आले.





महा आवास अभियान २.० जिल्हास्तरीय कार्यशाळे प्रसंगी नांदेड येथे मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अशोक चव्हाण



महा आवास अभियान २.० जिल्हास्तरीय कार्यशाळे प्रसंगी नाशिक येथे मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. छगन भुजबळ



महा आवास अभियान २.० जिल्हास्तरीय कार्यशाळे प्रसंगी उस्मानाबाद येथे मा. मंत्री, मृद व जलसंधारण तथा उस्मानाबाद जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.शंकरराव गडाख



महा आवास अभियान २.० जिल्हास्तरीय कार्यशाळे प्रसंगी वर्धा येथे मा. मंत्री, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.सुनिल केदार




**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

दुरध्वनी क्र. - ०२२ - २७५६१८२४, महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९

ई-मेल - directoriayruralhousing@gmail.com, वेबसाईट - www.mahaawaas.com

*"महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास, २०२२ पर्यंत सर्वांसाठी आवास"*